ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक २१३ वा ❑ भारतीय सौर दिनांक २२ आश्विन शके १९४८, शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ ❑ पाने ६ ❑ मूल्य:निशुल्क (खासगी वितरणासाठी)

विशेष लेख...

जेव्हा रक्ताच्या नात्यांचा गळा घोटला जातो...

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

आधुनिकतेच्या आणि उच्च शिक्षणाच्या शिखरावर बसलेला आजचा तरुण मानसिकदृष्ट्या किती एकाकी, कुंठित आणि हिंसक होत चालला आहे, याचा थरकाप उडवणारा पुरावा अमरावतीमध्ये समोर आला आहे. ज्या आईने बोट धरून चालायला शिकवले, त्याच जन्मदात्रीचा एका ३९ वर्षीय उच्चशिक्षित आयटी इंजिनिअरने किरकोळ वादातून गळा घोटला. पैशाने आणि शिक्षणाने माणूस प्रगल्भ होतो हा आपला समज या घटनेने पूर्णपणे खोटा ठरवला असून, या क्रौर्याने संपूर्ण समाजाच्या सद्सद्विवेकबुद्धीला हादरवून सोडले आहे.

शनिवार, १० ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नवसारी रिंग रोडवरील गजानन प्लाझा परिसरात हा दुर्दैवी प्रसंग घडला. रंजना कानफाडे (वय ६०) असे मृत मातेचे नाव असून, तुषार सतीश कानफाडे असे या निर्दयी मुलाचे नाव आहे. तुषार हा अविवाहित असून तो एका आयटी कंपनीत चांगल्या पगारावर वर्क फ्रॉम होम करत होता. घरात केवळ आई आणि मुलगा असे दोघेच राहत होते. वरवर पाहता सुरक्षित आणि स्थिर वाटणाऱ्या या घरात शनिवारी सकाळी असा कोणता वाद पेटला की ज्यामुळे तुषारच्या रागाचा पारा सर्व सीमा ओलांडून गेला, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, संतापाच्या भरात त्याने स्वतःच्याच आईचा गळा आवळला आणि या ६० वर्षीय माउलीचा जागीच अंत झाला.

या हत्याकांडातील सर्वात सुन्न करणारी बाब म्हणजे, गुन्हा केल्यानंतर तुषार पळून गेला नाही किंवा त्याने लपवाछपवी केली नाही. जन्मदात्रीला संपवल्यानंतर तो तिच्या मृतदेहाजवळच सुन्नपणे बसून राहिला. त्यानंतर तो स्वतः गाडगे नगर पोलीस ठाण्यात पोहोचला आणि अत्यंत निर्विकारपणे म्हणाला, ''साहेब, मी आईला संपवलंय... मी माझ्या आईचा खून केला आहे.'' स्वतःच्याच आईच्या हत्येची ही थंड कबुली ऐकून पोलिसांच्याही पायाखालची जमीन सरकली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला आणि तुषार कानफाडेविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली.

एका चांगल्या नोकरीवर असलेला, उच्चशिक्षित तरुण जेव्हा रागाच्या भरात एवढे टोकाचे पाऊल उचलतो, तेव्हा ते केवळ एका कुटुंबाचे नव्हे, तर संपूर्ण सामाजिक व्यवस्थेचे अपयश असते. एका वातानुकूलित खोलीत लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर जगणारा आणि वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली प्रत्यक्ष समाजव्यवस्थेपासून तुटलेला आजचा तरुण एका आभासी जगात हरवला आहे. तिथे की-बोर्डवरील बॅकस्पेस दाबून कोणतीही चूक सहज सुधारता येते, पण खऱ्या आयुष्यात रागाच्या भरात घेतलेले टोकाचे निर्णय थेट जन्मदात्रीचाच जीव घेतात, याचे भान त्याला उरलेले नाही. आईसारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि रक्ताच्या नात्यातही जेव्हा सुसंवाद संपतो, तेव्हा तिथे संशयाची, रागाची आणि हिंसेची भयंकर पोकळी निर्माण होते.

आधुनिकतेच्या झगमगाटात आणि उच्च शिक्षणाच्या शिखरावर बसलेला आजचा तरुण मानसिकदृष्ट्या किती एकाकी, कुंठित आणि हिंसक होत चालला आहे, हे अमरावतीच्या या काळजाचा थरकाप उडवणाऱ्या घटनेने उघडे पाडले आहे. आपण आजवर प्रगतीची व्याख्या केवळ मोठ्या पदव्या, परदेशातील नोकऱ्या आणि गलेलठ्ठ पगार यांपुरतीच मर्यादित करून ठेवली आहे. पण ज्या शिक्षणाने माणसाला संकटातही माणूस म्हणून जगायला शिकवायला हवे, तेच शिक्षण आज कुठेतरी उणे पडत आहे. एका वातानुकूलित खोलीत लॅपटॉपच्या स्क्रीनसमोर जगणारा आणि वर्क फ्रॉम होमच्या नावाखाली प्रत्यक्ष समाजव्यवस्थेपासून तुटलेला आजचा तरुण एका आभासी जगात हरवला आहे. तिथे की-बोर्डवरील बॅकस्पेस दाबून कोणतीही चूक सहज सुधारता येते, पण खऱ्या आयुष्यात रागाच्या भरात घेतलेले टोकाचे निर्णय थेट जन्मदात्रीचाच जीव घेतात, याचे भान त्याला उरलेले नाही. आईसारख्या अत्यंत जिव्हाळ्याच्या आणि रक्ताच्या नात्यातही जेव्हा सुसंवाद संपतो, तेव्हा तिथे संशयाची, रागाची आणि हिंसेची भयंकर पोकळी निर्माण होते.

आजकालच्या तरुणाईमध्ये सहनशीलता अक्षरशः शून्यावर आली आहे. प्रत्येक गोष्टीत इन्स्टंट परिणामांची सवय झाल्यामुळे, मनाविरुद्ध एखादी छोटीशी गोष्ट घडली तरी त्यातून येणारे नैराश्य आणि संताप पचवण्याचे मानसिक बळ त्यांच्यात उरलेले नाही. कृतज्ञता आणि त्याग हे शब्द तर जणू आजच्या पिढीच्या शब्दकोशातूनच हद्दपार झाले आहेत. हे केवळ एका कुटुंबाचे, त्या आईचे किंवा त्या इंजिनिअर मुलाचे वैयक्तिक अपयश नाही; तर ती आपल्या संपूर्ण समाजव्यवस्थेला लागलेली मोठी कीड आहे. आपण मुलांना जीवघेण्या स्पर्धेत जिंकायला तर शिकवले, पण नाती कशी जपायची, थोरामोठ्यांचा आदर कसा करायचा आणि भावनांवर नियंत्रण कसे मिळवायचे हे शिकवायला आपण सोयीस्करीत्या विसरलो. एकत्र कुटुंबातील संस्कारांची जागा आता स्मार्टफोन्सने घेतली आहे आणि जिव्हाळ्याच्या संवादाची जागा सोशल मीडियाने व्यापली आहे. राग, नैराश्य आणि हिंसेच्या या अंधाऱ्या गर्तेत आपली तरुण पिढी अत्यंत वेगाने ओढली जात आहे. आता वेळ आली आहे की समाजाने स्वतःच्या आत डोकावून, या निगरगट्ट होत चाललेल्या मानसिकतेचे अत्यंत कठोर आत्मपरीक्षण करावे. जोवर आपण या डिजिटल पिढीला केवळ एक यंत्र न बनवता पुन्हा एकदा संवेदनशील माणूस म्हणून घडवण्याची सामूहिक जबाबदारी घेत नाही, तोवर अशी रक्ताची नाती विखुरताना आपण केवळ मूकदर्शक बनून राहू.

आजकालच्या तरुणाईमध्ये सहनशीलता अक्षरशः शून्यावर आली आहे. प्रत्येक गोष्टीत इन्स्टंट परिणामांची सवय झाल्यामुळे, मनाविरुद्ध एखादी छोटीशी गोष्ट घडली तरी त्यातून येणारे नैराश्य आणि संताप पचवण्याचे मानसिक बळ त्यांच्यात उरलेले नाही. कृतज्ञता आणि त्याग हे शब्द तर जणू आजच्या पिढीच्या शब्दकोशातूनच हद्दपार झाले आहेत. आपण मुलांना जीवघेण्या स्पर्धेत जिंकायला तर शिकवले, पण नाती कशी जपायची आणि भावनांवर नियंत्रण कसे मिळवायचे हे शिकवायला आपण विसरलो.

राग, नैराश्य आणि हिंसेच्या या अंधाऱ्या गर्तेत आपली तरुण पिढी नेमकी कुठे चालली आहे? या प्रश्नांची उत्तरे आता केवळ पोलिसांच्या तपासातून मिळणार नाहीत, तर समाजाला त्याचे अत्यंत कठोर आत्मपरीक्षणच करावे लागेल.

महाराष्ट्रातील वाचन संस्कृती समृद्ध करणे हाच उद्देश-शिरीष चिटणीस

टीव्ही आणि साहित्य विश्वात प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ कवी शरदेंदु शुक्ल यांनी हास्य-व्यंग रचनांनी संपूर्ण सभागृह हसवून सोडले

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

पुणे – हिंदी कवी संमेलन हे २४ व्या 'पुणे पुस्तक जत्रा' मध्ये वैशिष्ट्यपूर्ण ठरले. 'पुणे पुस्तक जत्रा' मध्ये मराठी कार्यक्रमांची ५ दिवस रेलचेल चालू होती. या पुस्तक जत्रेमध्ये हिंदी हास्य कवी संमेलन हेही वैशिष्टपूर्ण ठरले. श्री शिरीष चिटणीस आणि श्री. राजन यांनी आयोजित केलेल्या हिंदी कवी संमेलनामध्ये शरदेंदु शुक्ल, डॉ. प्रेरणा उबाळे, महेंद्र माणिक, सुनील जोशी हे कवी उपस्थित होते. यांनी आपल्या सरस रचना सादर करून सर्वांना मंत्रमुग्ध केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले केसरीचे संपादक निखिल गजेंद्रगडकर, उत्कर्ष प्रकाशनचे प्रमुख सु. वा. जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. केसरीचे संपादक निखिल गजेंद्रगडकर हिंदी कवी संमेलनाच्या निमित्ताने काका हाथरसी यांच्या हास्य आणि राजकीय, व्यंग्य कवितांची आठवण करून दिली. शिवाय हिंदीचे वरिष्ठ लेखक धर्मवीर भारती यांच्या ''धर्मयुग'' पत्रिकेच्या आठवणी त्यांनी जाग्या केल्या. हिंदी चित्रपट, गाणी यामुळे हिंदी भाषा जगभरात पोहोचली असे त्यांनी सांगितले.



महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये वाचन संस्कृती समृद्ध करणे, विविध भाषांमधील सांस्कृतिक देवाणघेवाण वाढवणे आणि मराठी-हिंदी साहित्यातील सहसंबंध अधिक दृढ करणे या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना शिरीष चिटणीस म्हणाले या पुणे पुस्तक जत्रेमुळे वाचन संस्कृती वाढत असून वाचनाकडे लोकांचा कल वाढलेला आहे. सातार मध्ये गेले २७ वर्षापासून आपण ग्रंथ महोत्सवाचे आयोजन करत असून महाराष्ट्रातील विविध कानाकोपऱ्यात अशाच प्रकारचा ग्रंथ महोत्सव भरवले जात आहेत. त्याच पद्धतीने पुणे पुस्तक जत्रेमध्ये लोकांच्या गर्दी आणि पुस्तक खरेदी करणाऱ्यांची दर्दी वाढू लागली आहे. या पुणे पुस्तक जत्रेत मराठी बरोबर हिंदी आणि इंग्रजी विषयाची विविध व्याख्याने, कवी संमेलनाचे आयोजनही केले जात असून यापुढेही अशे उपक्रम आपण करत राहू.

या प्रसंगी मराठी आणि हिंदी साहित्यातील परस्परावलंबित्व, अनुवादाचे महत्त्व आणि विविध भाषांमधील सांस्कृतिक देवाणघेवाणीवर विशेष चर्चा झाली.कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन डॉ. प्रेरणा उबाळे यांनी केले. संमेलनात विविध नामांकित कवींनी आपल्या रचना सादर करून उपस्थितांची दाद मिळवली.

टीव्ही आणि साहित्य विश्वात प्रसिद्ध असलेले ज्येष्ठ कवी शरदेंदु शुक्ल यांनी हास्य-व्यंग रचनांनी संपूर्ण सभागृह हसवून सोडले. पूर्वी वीर रसात लेखन करणारे शुक्ल यांनी ज्येष्ठ कवी माणिक यांच्या सल्ल्याने हास्य-व्यंग काव्यावर भर देण्यास सुरुवात केली. त्यांनी ''मरो मरो सरकारी सांड की तरह...'' या कवितेतून भ्रष्ट व्यवस्थेवर उपरोधिक भाष्य केले, तसेच खटारा स्कूटरवरून राजकीय व्यंग आणि कौटुंबिक प्रसंगांवर आधारित कविता सादर करून दाद मिळवली. हिंदी व मराठी साहित्यात नावाजलेले आणि अनेक पुरस्कारप्राप्त कवी महेंद्रकुमार माणिक यांनी आधुनिक लग्नसंस्कृती, शादी. कॉम आणि महानगरांतील जीवनशैलीवर उपरोधिक कविता सादर केल्या. त्यांच्या व्हॅलेंटाईन या पुस्तकाची प्रस्तावना प्रसिद्ध व्यंगचित्रकार आबिद सुरती यांनी लिहिल्याची आठवण त्यांनी दिली. तसेच प्राणीसंग्रहालयातील प्राण्यांच्या संवादातून माणसांमधील जातीयता व दहशतवादावर भाष्य करणारी त्यांची रचना विशेष गाजली. संयोजिका व कवयित्री डॉ. प्रेरणा उबाळे यांनी मानवी भावना व सामाजिक विषयांवर कविता मांडल्या. त्यांनी ''कलम कुछ ऐसा लिखना चाहती है'', ''अभाव की नजर'', ''मिटता कुछ नहीं जिंदगी से'', ''विज्ञापन पर अभिनेता जी की मुस्कान देखी'' कविता सादर केल्या. ''आज कलम कुछ ऐसा लिखना चाहती है'' विषयावरील कवितेतून त्यांनी लेखणीचे सामर्थ्य अधोरेखित केले, तर अभाव की नजर आणि विज्ञापन पर अभिनेता जी की मुस्कान या रचनांमधून समाजातील विषमता, गरिबी आणि सर्वसामान्यांच्या संघर्षाचा वास्तववादी विरोधाभास उघड केला.

साहित्योत्सवांचे आयोजन करणारे कवी सुनील जोशी यांनी प्रेम, निसर्ग आणि सामाजिक जाणिवांवर कविता सादर केल्या. ''मैं तेरे प्रेम में गीत रच जाऊंगा'' हे मुक्तक, पावसावरील कविता, नेटवर्क नसलेले गाव आणि डाकियाच्या पत्राची वाट पाहणाऱ्या गावाची भावूक कहाणी त्यांनी मांडली. तसेच संगिनी या रचनेद्वारे त्यांनी स्त्रीशक्तीचा गौरव केला.

वाचन संस्कृती व भाषिक एकतेचा संदेश

या कवी संमेलनात मराठी आणि हिंदी भाषेतील काव्यसंस्कृतीचा अप्रतिम मिलाफ पाहायला मिळाला. पुणेकरांचा उदंड प्रतिसाद पाहता, भावी काळातही अशा प्रकारच्या साहित्यिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन सातत्याने करत राहण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला. पुण्यात गेली २४ वर्षे सातत्याने पुस्तक प्रदर्शनांचे यशस्वी आयोजन करणारे पुणे पुस्तक जत्रा चे संयोजक पी. एन. आर. राजन आणि समन्वयक शिरीष चिटणीस यांनी या महोत्सवाचे संयोजन केले होते.

मानसिक रुग्णांबद्दल समानुभूती असावी – डॉ. प्रकाश अंबेकर

जागतिक मानसिक आरोग्य सप्ताहाचा समारोप

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

जालना – मानसिक रुग्णांबद्दल समाजाने व कुटुंबातील सदस्यांनी समानुभूती व्यक्त करून त्यांना आधार द्यावा, असे आवाहन मानसोपचारतज्ज्ञ डॉ. प्रकाश अंबेकर यांनी केले.

अंकुशराव टोपे महाविद्यालय, मानसशास्त्र विभागात मानस फाउंडेशन आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने १६ ऑक्टोबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य सप्ताहाच्या समारोपानिमित्त लघुपट व संवाद सत्रात ते प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, अंकुशनगर कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. शकील खान, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, विनोद जैतमहाल आदींची विशेष उपस्थिती होती.

डॉ. प्रकाश अंबेकर पुढे म्हणाले की, शब्दांचा वापर जपून करावा. शब्द तलवारीपेक्षाही धारदार असल्यामुळे त्यांचा वापर संवादासाठी करावा, वादासाठी नाही.



या वेळी विक्रम राठोड यांनी स्किझोफ्रेनिया आजार व उपचारांविषयी स्वतःचे अनुभव सांगितले. मानसिक आजार कसे ओळखावे आणि तत्काळ उपचार कसे करून घ्यावेत याविषयी त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. डॉ. सुजाता देवरे यांनी प्रास्ताविक करून मानसिक आजारांविषयी जनजागृतीपर तीन लघुपट दाखवले. यासाठी प्रा. डॉ. प्रियंका सेठिया यांनी तांत्रिक साहाय्य केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य दादासाहेब गजहंस यांनी सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व सांगून मानसशास्त्र विभाग व मानस फाउंडेशनच्या कार्याचे कौतुक केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. श्रीपत गायकवाड यांनी, तर आभारप्रदर्शन प्रा. डॉ. अविन अकोलकर यांनी केले.

कार्यक्रमास डॉ. विलास वरखडे, डॉ. नीलेश कुंभकर्ण यांच्यासह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शारदीय नवरात्र....

ज्योतिर्मय 🕮 साहित्य

निसर्गातील ऋतू बदल,मानवी मनात संचारणारे चैतन्य, आदिशक्तीच्या विविध रूपाची आराधना, आध्यात्मिक वारसा, समाजातील सज्जन शक्तीचे संघटन या सर्वांचे प्रतिबिंब म्हणजेच नवरात्र. घराघरात घट आणि घटाघटात आदिशक्तीचे अधिष्ठान म्हणजे नवरात्र. सर्वत्र नारीशक्तीचे जागरण म्हणजे नवरात्र. आश्विन महिन्याचा प्रारंभ झालेला असतो. पाऊस परतीच्या प्रवासाला निघालेला, थंडीची चाहूल लागलेली व निसर्ग बहरलेला असतो. नवरात्राची सुरुवात घटस्थापना. दाराला आंब्याच्या पानाचे तोरण लावून व अंगणात सुबक रांगोळी काढून सुरुवात केली जाते. मातीचा घट देवीमाते समोर मातीत ठेवून त्या मातीत सप्त धान्याची पेरणी करतात. घटाचे विधिवत पूजन करून त्यावर प्रतिदिनी एकेक फुलाची माळ सोडायची. कुलस्वामिनी देवीचे पूजन करायचे. यालाच देवी घटात बसली असे संबोधतात. याचं पद्धतीने रोज पूजन करून एकेक माळ वाढत जाते. शेवटची माळ नवमी तिथीला व विजयादशमीने नवरात्राची सांगता होते. नवरात्र सुरू झाल्यापासून नवरात्र संपेपर्यंत अखंड दीप देवीसमोर लावला जातो.



तेज, प्रकाश आणि सकारात्मक ऊर्जेचे प्रतीक तसेच देवीचे साक्षात रूप म्हणून दिवा अखंड सुरु रहावा हा त्यामागील खरा उद्देश. नकारात्मक विचार, अज्ञान व दुःख दूर व्हावे व जीवन प्रकाशमान व्हावे हा त्यामागील भाव. या काळात जिकडे तिकडे ''उदो बोला उदो'' या आरतीचे सूर कानी पडतात. धूप, राळ, गुग्गुळ ,अगरबत्ती, कापूर यांचा सुगंध सर्वत्र दरवळतो व मन प्रसन्न होते. घरोघर देवीच्या विविध आरत्या, गोंधळ, जोगवा ,भजन, दुर्गा सप्तशतीचे पाठ , होमहवन,कुंकूमार्चन, कुमारिका पूजन, ललिता पंचमी तसेच सामूहिक कार्यक्रमात घागरी फुंकणे, दांडिया, गरबा सारखी नृत्ये यामुळे दिवस कसा उजाडतो व कसा मावळतो हे कळतही नाही. रात्रीही जागरण,भक्तीगीत गायन, अष्टके यासारखे विशेषतः स्त्रियांचा सहभाग असलेले भरगच्च कार्यक्रम होतात. महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठे श्री तुळजाभवानी माता (तुळजापूर), श्री रेणुका माता (माहूरगड), श्री महालक्ष्मी अंबाबाई (कोल्हापूर) ही तीन व अर्धे पीठ श्री सप्तशृंगी माता (वणी) आहेत.या देवी तसेच गावोगावच्या देवीच्या मंदिरात भाविक दर्शनाची रांग लावतात. देवीची विविध नऊ रूपे शैलपुत्री,ब्रह्मचारिणी, चंद्रघंटा, कुष्मांडा, स्कंदमाता, कात्यायनी, कालरात्री, महागौरी,सिद्धिदात्री ही आहेत.प्रत्येक रूपाचे एक आगळे महत्व व आख्यायिका सांगितली जाते. नारिंगी, पांढरा, लाल, निळा, पिवळा, हिरवा, राखाडी, जांभळा,मोरपंखी असे नऊ रंग ठरलेले आहेत. त्या दिवसाच्या रंगाप्रमाणे साडी किंवा पोशाख करण्यात भक्त विशेष करून स्त्रिया दंग राहतात. नऊ दिवस देवीची आराधना करून प्रभू श्रीरामांनी दशमीला रावणावर विजय प्राप्त केला. सत्याने असत्यावर मिळविलेला हा विजय होता. म्हणून या दिवसाला विजया दशमी असेही म्हणतात. शारदीय नवरात्राचा शेवट दसरा म्हणजेच विजयादशमीने होतो. झेंडूच्या फुलांच्या माळा करून घर, दुकान, परिसर, वाहने सर्वांची पूजा करून सुशोभित करायचे. सायंकाळी सीमोलंघन करून शमी किंवा आपट्याची पाने सोने म्हणून आणायची. याला ''सोने लुटणे'' म्हणतात. वडीलधाऱ्यांना सोने देऊन नमस्कार करून त्यांचे आशीर्वाद घ्यायचे. सर्व मित्र,आप्तेष्टांना सोने द्यायचे ,भेटायचे व दसऱ्याच्या शुभेच्छा द्यायच्या असा रिवाज आहे. आपल्या जीवनातील अंधः कार दूर व्हावा,आपण केलेले अनुष्ठान सिद्धीस जावो तसेच आपल्या मनातील संकल्प पूर्ण व्हावा अशी कामना व्यक्त करतो. आपणा सर्वांना नवरात्री व विजया दशमीच्या हार्दिक शुभेच्छा!

अरविंद कुळकर्णी
(सेवानिवृत्त गणित शिक्षक)
भ्रमण. - ९८२२६४२२९४



जात्यावरच्या ओव्या.....

माय माऊलीची माया
भवती गोकुळ दाटल
गलका लेकराचा झाला
मन भरून पावल ||८९३||

माय माऊलीची माया
नही मिळत बाजारी
तोंड सुकता बाळाच
धडधड तिच्या उरी ||८९४||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

मनोपनिषद अर्थात मनाचे श्लोक-भाग ८०



ज्योतिर्मय साहित्य

पण हा भवसागर म्हणजे एक मायाजाल आहे. ते भल्याभल्यांना सोडवत नाही. भगवंताची माया अत्यंत प्रबळ आहे. एखाद्या कोळ्याच्या जाळ्यात मासे अडकावेत तसा माणूस या मायेच्या जाळ्यात अडकतो. रामकृष्ण परमहंसांनी याबाबत बोलताना एका ठिकाणी अतिशय सुंदर दाखला दिला आहे. ते म्हणतात जे मासे कोळ्याच्या अवतीभवती असतात, ते जाळ्यात अडकतात. पण जे मासे कोळ्याच्या पायाजवळ असतात, ते मात्र जाळ्यात अडकत नाहीत. आपण संसारी माणसे म्हणजे या संसारसागरातील मासे. मायारूपी जाळ्यात आपण अडकतो. पण आपण जर भगवंताच्या पायाशी राहिलो, त्याचे चरण जवळ केले तर मायेच्या जाळ्यातून आपण सहीसलामत सुटू शकतो.



देवाने आपल्याला पोट दिले आहे. पोट ही अशी गोष्ट आहे की ती कधी भरतच नाही. अग्निमध्ये आहुती टाकल्यानंतर अग्नी आणखी प्रज्वलित होतो. तसेच हे आहे. संसाराची आसक्ती देखील अशीच आहे. ती कधीच संपत नाही. म्हणून ती थोडी का होईना पण विसरण्याचा प्रयत्न करावा. ते सोपे नाही. पण भगवंत प्राप्ती करून घ्यायची असेल तर ती बाजूला ठेवता आली पाहिजे.

आपली संसाराची हाव कधी संपत नाही. हवेपण सुरूच राहते. त्यातून मग एखादी गोष्ट नाही मिळाली आणि ती दुसऱ्याकडे असेल तर मत्सर किंवा द्वेष निर्माण होतो. मत्सराला काही कारण लागत नाही. म्हणून त्याची तुलना समर्थ गाढवाशी करतात. परमार्थात तर मत्सर अतिशय हानिकारक. तेव्हा अशा मत्सराचा निकराने म्हणजे सर्वशक्तीनिशी सामना करायला हवा. त्यासाठी विवेक आणि वैराग्य ही दोन प्रभावी शस्त्रे आहेत. मत्सर आणि संसाराची आसक्ती टाकून देऊन श्रीरामाला हृदयी धारण करा म्हणजे हा भवसागर तरून जाल असे समर्थांचे सांगणे आहे. नाम आहे आदी अंती, नाम सर्व सार, आहे बुडत्याला नौका ठेवली आधार.

स्वसंवाद -


१. मी या संसारसागरात मायेच्या जाळ्यात अडकलो आहे हे मला जाणवते का ?


२. ''कितीही दिले तरी न भरणारे हे दुर्भर पोट (आसक्ती)'' याच्या मागे धावताना, मी कधी समाधानाचा अनुभव घेतला आहे का?


३. जेव्हा मला एखादी गोष्ट मिळत नाही आणि ती दुसऱ्याकडे दिसते, तेव्हा माझ्या मनात नकळत मत्सर निर्माण होतो का ?

४.संसाररूपी जाळ्यातून सहीसलामत सुटण्यासाठी माझ्या ठायी भगवंताप्रती अनन्य शरणागती आहे का?

(क्रमशः)







श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

नाम व भगवंत

ज्योतिर्मय साहित्य

'राम राम' म्हणून राम कसा भेटेल या विचारण्यात काहीच अर्थ नाही. उलट असे म्हणता येईल की, 'राम राम' म्हटल्याशिवाय राम भेटणेच शक्य नाही. व्यवहारातही आपला हाच अनुभव आहे. समजा, आपल्याला एका गावाला जायचे आहे म्हणून आपण स्टेशनवर गेलो, आणि जिथे जायचे आहे त्याचे सर्व वर्णन केले पण नाव सांगता आले नाही, तर आपल्याला तिकीट मिळेल का ? उलट, त्या गावातली काही माहिती नाही पण नाव ठाऊक आहे, तर आपल्याला तिकीट मिळून तिथे जाता येईल. म्हणजे, ठिकाण माहितीचे आहे पण नाव तेवढेच न आठवले तर काहीही उपयोग होत नाही. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, बाकी सर्व केले पण नाम नाही घेतले तर काही उपयोग होत नाही; म्हणून नाम घेणेच जरूर आहे. नामाने भगवंताची प्राप्ती होणार ही खात्री असावी.

भगवंताच्या नामाची गरज दोन तऱ्हेने आहे : एक, प्रपंचाचे स्वरूप कळण्यासाठी, आणि दुसरी, भगवंताच्या प्राप्तीसाठी. खायला-प्यायला पोटभर, बायकोमुले, घरदार, वगैरे सर्व गोष्टी असल्या तरीसुद्धा आपल्याला काळजी आणि तळमळ का असते हे आपल्याला कळत नाही. याचा अर्थ, दुःखाचे खरे स्थान कुठे आहे हे कळत नाही. ते कळण्याकरिता भगवंताच्या नामाची गरज आहे. भगवंताची तळमळ लागेपर्यंत नामाची जरुरी आहे; नंतर, भगवंतावाचून आपल्याला दुसरा आधार नाही म्हणून नाम घ्यायला पाहिजे; आणि शेवटी, भगवंताच्या दर्शनानंतर नाम सवयीने आपोआप येते.

एकूण, आरंभापासून शेवटपर्यंत भगवंताचे नामच शिल्लक राहते. जो नामस्मरण करील आणि त्याचे अनुसंधान ठेवील त्याला भगवंताची जिज्ञासा आपोआप उत्पन्न होईल. नामाकरिता नाम घ्या, की त्यात राम आहे हे कळेल. नाम घेताना, जे घडेल ते चांगले आणि आपल्या कल्याणाचे आहे असा भरवसा ठेवा.

भगवंताचे नाम हीच सच्चिदानंदस्वरूप सद्वस्तू होय. भगवंताच्या नामात जो स्वतःला विसरला तो खरा जीवन्मुक्त होय. जे काय साधायचे ते हेच. बाकीच्या गोष्टी स्वप्नासारख्या समजाव्यात. त्या प्रचीतीस येतात पण नसतात. देहाशी असलेले आपले तादात्म्य हे एक प्रकारच्या सवयीने आणि अभ्यासानेच झालेले आहे. याच्या उलट अभ्यास करून भगवंताचे चिंतन केले तर जसे आज देहाशी तादात्म्य आहे त्याचप्रमाणे भगवंताशी आपले तादात्म्य होईल.

सकाळी उठताना, रात्र निजताना, जेवायच्या आधी, नाम घ्यायचेच आणि भगवंताची आठवण करायचीच असा नियम करावा. तो आयुष्यात फार उपयोगी पडेल.

***



आपले सण, आपले उत्सव
शारदीय नवरात्र

शरद ऋतु तील हा कालावधी आरोग्यासाठी नाजूक असल्याने हा यमाच्या कठीण सूळ्या सारखा आहे असे म्हटले आहे.
देवी भागवतात नवरात्री हे व्रत कसे करावे? हे लिहीले आहे.
नवरात्री साठी सोळा हात लांब व तितकेच रुंद मंडप बनवावा. हा मंडप माती व शेण आणि सारवावा. या मंडपात मध्यावर चार हात लांब व रुंद एक वेदी निर्माण करावी. ही वेदी उंचीला एक हात उंच असावी. सर्व मंडप तोरणे पताका लावून सजविण्यात यावा.प्रतिपदेच्या दिवशी प्रातःकाळी नदी,आड, विहीर किंवा घरी स्नान करावे. पूजा सांगणाऱ्या ब्राह्मणाचे स्वागत करावे व त्याला शक्तीनुसार वस्त्रे अलंकार द्यावीत. देवी भागवत या दिव्य ग्रंथाचा या काळात पाठ करावा. वेदीवर रेशमी वस्त्र अंथरून देवीचे सिंहासन तयार करावे. त्यावर चार भूजेत आयुधे धारण करणाऱ्या देवीची प्रतिमा स्थापन करावी. देवी शंख, चक्र, गदा पद्म धारी असावी. किंवा अठरा भुजा असणारी प्रतिमा असावी. जर अशी प्रतिमा उपलब्ध नसेल तर ,नवार्ण मंत्र युक्त यंत्राची स्थापना करावी. जवळ पंच पल्लव युक्त कलश स्थापित करावा. तो जलाने भरावा. प्रतिपदेच्या दिवशी विधिवत स्थापना करून पूजन करावे. हे पूजन, मनुष्याचे मनोगत पूर्ण करणारे असते.



"तेल व राजकीय स्वार्थ "

मित्रांनो आणि वाचकहो, पश्चिम आशिया व इराण, इराक, इस्रायल व अमेरिका हा प्रदेश गेल्या दशकभर अस्थिर आहे. याला तेल व राजकीय स्वार्थ आहे. कोणत्याही युद्धात मणुष्य हानी आणि आर्थिक अस्थिरता होऊन निसर्ग, व्यवस्था व पुढच्या पिढीला परिणाम भोगावे लागतात. प्रदुषित वातावरण, औद्योगिक प्रकल्पावर सुध्दा परिणाम होतात. समुद्रात होणार्या तेलगलतीमुले सागरी जैव-विविधतेचे विनाश होते. तेलसंपत्ती, धार्मिक-साप्रंदायिक संघर्ष, महासत्ताची राजकीय स्पर्धा व वर्चस्वाची चढाओढ यातून लष्करी संघर्ष वाढत जातो. भारताप्रमाने अनेक देशासमोर तेलसंकट आहे. इंधन व ऊर्जासंकट व बचावासाठी ऊपाय योजना देशाला कराव्या लागत आहे. राजकीय स्वार्थाचे तेल या असंतोषाच्या वणव्यात ओतले जात आहे अनेक देशासमोर संकट ऊभे राहात आहे. प्रत्येक देशाच्या अर्थ व्यवस्थेवर थेट परिणाम होत आहे. त्याचे गांभीर्य केवल कोण्या एकट्यादुकट्या देशाने नव्हे तर संपूर्ण जगाने जाणले पाहिजे. आज एवढे पुरे. तुम्ही वाचत राहा सुख दुःखाचे तरंग माणसा - माणसाचे सुप्रभात. आपला दिवस आनंदी जावो हिच गुरू चरणी प्रार्थना.



लिंबूचे आयुर्वेदिक फायदे

ज्योतिर्मय साहित्य



लिंबात व्हिटॅमिन-सी चे प्रमाण खूप जास्त असते. हे शरिरासाठी अँटिऑक्सिडंट म्हणून कार्य करते, जे मुक्त रॅडिकल्सला तटस्थ करते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार, पक्षाघात आणि कमी रक्तदाबाचा धोकाही कमी होतो. सरासरी आकाराच्या लिंबाच्या रसात ३१ पर्यंत व्हिटॅमिन-सी असते, तर प्रौढ व्यक्तीला दररोज ६५ ते ९० व्हिटॅमिन-सी आवश्यक असते.

वजन घटवण्यात मदत करतो : लिंबूत असलेले पॉलीफेनॉल अँटीऑक्सिडंटमध्ये वजन कमी करण्याचे गुणधर्म आहेत. लिंबूत असलेले अँटिऑक्सिडंट्स रक्तातील ग्लुकोजची पातळी कमी करून इन्सुलिन प्रतिरोधक क्षमता सुधारू शकतात. या दोन्ही गोष्टी टाईप-२ मधुमेहाचे मुख्य कारण मानल्या जातात.

त्वचा सुधारते : लिंबूत असलेले व्हिटॅमिन-सी हे त्वचेवरील सुरकुत्या कमी करते. तसेच, त्वचेचा एजिंग पासून (वृद्धत्वापासून) बचाव करते आणि उन्हामुळे होणाऱ्या नुकसानापासून त्वचेचे रक्षण करते.

पचनक्षमता मजबूत होते : बद्धकोष्ठतेपासून आराम मिळावा यासाठी सकाळी लिंबू पाण्याचे सेवन करावे. कोमट पाण्यात लिंबू मिसळून प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. लिंबू पाण्याने पचनक्रिया सुधारते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९

नैसर्गिक ब्रेथ फ्रेशनर : अनेक वेळा लसूण, कांदा किंवा मासे खाल्ल्यानंतर तोंडाला दुर्गंधी येते. लिंबू पाणी प्यायल्याने श्वासाच्या दुर्गंधीची समस्या दूर होते. तसेच लिंबू लाळ उत्तेजित करते.

मुतखड्याच्या आजारात मदत होते : लिंबात असलेले सायट्रिक ॲसिड मुतखड्याचा धोका कमी करू शकते. सायट्रिक ॲसिड मध्ये सायट्रेट नावाचे संयुग असते, जे लहान लहान मुतखड्याचे स्टोन्स फोडण्यास मदत करते.

ॲनिमियापासून बचाव करते : लोहाच्या कमतरतेमुळे होणारा अशक्तपणा म्हणजेच ॲनिमिया हा एक अतिशय सामान्य आजार आहे. जेव्हा एखाद्या व्यक्तीला अन्नात पुरेसे लोह मिळत नाही, तेव्हा याचा त्रास होतो. लिंबूत काही प्रमाणात लोह असते.

हृदयाला हेल्दी ठेवते : जर एक लिंबू संपूर्ण खाल्ले तर शरिराला ५२% व्हिटॅमिन-सी मिळू शकते. लिंबूपाणी प्यायल्याने व्हिटॅमिन-सी भरपूर प्रमाणात मिळते. व्हिटॅमिन-सी मुळे हृदयविकार आणि स्ट्रोक्सचा धोका कमी होतो. तसेच, लिंबूत असलेले फायबर आणि प्लांट कंपाऊंड देखील हृदयविकाराचा धोका कमी करण्यासाठी फायदेशीर ठरतात.



कात्यायनी

नवरात्रीच्या सहाव्या दिनी
कात्यायनीची पूजा करुन
मातेस नमन करावे
महर्षी कात्यायनाने देवीची
सर्वप्रथम पूजा केल्याने
देवीला कात्यायनी संबोधावे

कात्यायनी मातेचे रूप
अत्यत तेजःपुंज असून
चारा भुजा आहेत
हाती अभयमुद्रा,वरमुद्रा,
तलवार,कमळाचे फूल
भक्तजन आनंदे पाहेत

स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय जळगावच्या भाषा व वाङ्मय मंडळातर्फे वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा



ज्योतिर्मय साहित्य

जळगाव (गोकुळसिंग राजपूत)- स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालय जळगाव वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला. भारताचे भूतपूर्व राष्ट्रपती डॉ ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला होता. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत समारंभाने झाली. महाविद्यालयाच्या प्राचार्या राजश्री महाजन यांनी डॉ ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख वक्ते प्रा राजेंद्र निकुंभ यांनी डॉ कलाम यांच्या जीवनाबद्दल असलेल्या प्रेरणात्मक गोष्टींना उजाळा दिला. आपल्या स्वानुभवातून आपण शिकले पाहिजे व सकारात्मक दृष्टिकोनातून जीवन घडविले पाहिजे हा मूलमंत्र कलामांनी त्यांच्या आयुष्यातून दिला. मानवी जीवनात यशाला अनन्यसाधारण महत्त्व आहे आणि ते मिळवण्यासाठी मेहनत व सचोटी हे साधन असणे आवश्यक आहे- अशी दिशा कलामांनी त्यांच्या जीवनातून दिली असे प्रतिपादन प्रा निकुंभ यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा राजश्री महाजन यांनी कलामांनी राष्ट्रासाठी दिलेले योगदान हे अनमोल आहे असे मांडले. वाचन प्रेरणा दिनाच्यानिमित्ताने महाविद्यालयाचे प्रा रुपम निळे, प्रा योगेश धनगर , प्रा ईशा वडोदकर यांनी कलाम यांच्या अग्निपंख या पुस्तकातील उताऱ्यांचे वाचन केले. या निमित्ताने विद्यार्थी व शिक्षकांकडून वाचन प्रेरणा अभियानाअंतर्गत विविध पुस्तकांचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या प्रसंगी उपप्राचार्या प्रा आर एस महाजन, पर्यवेक्षिका प्रा शिल्पा सरोदे, समन्वयक प्रा उमेश पाटील व प्रा गुणवंत वंजारी व भाषा व वाङ्मय मंडळाचे अध्यक्ष प्रा अर्जुनशास्त्री मेटे उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा गणेश सूर्यवंशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा संदीप वानखेडे, प्रा रूपम निळे, डॉ जयंत इंगळे, प्रा आर एन निकुंभ,, प्रा संध्या महाजन, प्रा योगेश धनगर, प्रा ज्योती मोरे यांनी अनमोल सहकार्य केले.

क्रोधाचा त्याग का करावा?



ज्योतिर्मय साहित्य

मानवी जीवनातील पांच विकार हे मानवास पशु पेक्षा ही हीन बनवितात. काम, क्रोध, मोह, माया, मत्सर यातील क्रोध हा माणसाचा मोठा शत्रू आहे. क्रोधीत व्यक्ती क्रोधाच्या भावनेत नको ते करून बसतो. क्रोधाच्या त्राग्यातून घडलेली घटना अतर्क्य असते, क्रोधाचे विघातक परिणाम केवळ त्या व्यक्तीलाच भोगावे लागतात असे नाही तर, त्यांच्या परिवाराला, मित्रांना, व समाजालाही परिणाम भोगावे लागतात. क्रोधामुळे व्यक्ती अनेक आजारांना निमंत्रण देतो. क्रोधामुळे व्यक्तीला अनेक असाध्य आजार जडतात. क्रोधामुळे व्यक्ती चीड- चिडी बनते, रागीट बनते, चिंताग्रस्त बनते, व छोट्या-छोट्या बाबीवर सर्वांवर चिडते ही चिडखोर वृत्ती व्यक्तीला पशु पेक्षाही हीन, दीन बनविते म्हणून समाजातील प्रत्येकाने क्रोधाच्या आहारी जाऊ नये.


धोंडीरामसिंह ध. राजपूत
वैजापूर, छत्रपती संभाजीनगर
मो. ९४२१३१२२४४

दुसरे असे की क्रोधामुळे संभ्रम निर्माण होतो, हा संभ्रम व्यक्तिची बुद्धी भ्रष्ट करतो, भ्रष्ट बुद्धीमुळे तर्क नष्ट होतात, आणि तर्कचा नाश झाला की, अधोगती येते. म्हणून क्रोधाचा सर्वांनी त्याग करणेच योग्य होय.

शालेय विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत स्वामी विवेकानंद महाविद्यालयाच्या मुलींचा डंका!



ज्योतिर्मय साहित्य

जळगाव (गोकुळसिंग राजपूत)- शालेय विभागीय सॉफ्टबॉल स्पर्धेत स्वामी विवेकानंद कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने उत्कृष्ट कामगिरी करत दिमाखदार विजय मिळवला. १९ वर्षांखालील वयोगटातील अंतिम सामन्यात नाशिक विभागाच्या संघाचा पराभव करून महाविद्यालयाच्या मुलींनी विभागीय विजेतेपद पटकावले. या यशामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील कामगिरीत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

या विजयी संघात मनाली कुलकर्णी, आर्या ठोंबरे, केतकी ईखे, वैष्णवी चौधरी, सृष्टी सोनवणे, अमृता माळी, वृत्ती सोगठी, मयुरी कोळी, राशी राणा, दीक्षा सेजवाल, भूमी धनगर, चिन्मयी डबीर, विधी जासुजस, आमीना मकरा, अवनी राणे, हर्षित पाटील आणि दिव्या टेकावडे या खेळाडूंचा समावेश होता.

खेळाडूंनी सांघिक समन्वय, जिद्द आणि उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत विजय मिळवला.

या संघाला महाविद्यालयाचे क्रीडा शिक्षक डॉ. रणजीत पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. खेळाडूंच्या मेहनतीला आणि मार्गदर्शनाला मिळालेल्या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने विजयी संघाचे अभिनंदन करण्यात आले. यावेळी एम.जे. स्वायत्त महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. केतन नारखेडे, के.सी.ई. सोसायटी कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक प्रा. आर. बी. ठाकरे, प्रा. स्वाती बऱ्हाटे, उपप्राचार्या प्रा. राजश्री महाजन, पर्यवेक्षिका प्रा. शिल्पा सरोदे, कला व वाणिज्य शाखेचे समन्वयक प्रा. उमेश पाटील, विज्ञान शाखेचे समन्वयक प्रा. गुणवंत वंजारी तसेच जिमखाना समितीच्या चेअरमन प्रा. वर्षा पाटील यांनी खेळाडूंचे कौतुक करून त्यांच्या पुढील क्रीडा वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

राजीव गांधी महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा




ज्योतिर्मय साहित्य

करमाड – राजीव गांधी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय करमाड येथे १५ ऑक्टोबर २०२६ रोजी डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव एस. मुळे हे होते. याप्रसंगी, व्यासपीठावर उपस्थित डॉ. एस. एस. मुळे सर व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. मनोज देवकर सर यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

वाचन प्रेरणा दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. एस. मुळे सर व मनोज देवकर सर यांना पुस्तके भेट देण्यात आली.अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. एस. एस. मुळे सर यांनी डॉ. अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याचा आढावा घेत, आजच्या इंटरनेट व मोबाईलच्या युगात वेळात वेळ काढून दिवसातून किमान २० ते २५ मिनिटे एखादे चांगले पुस्तक वाचून आपले जीवन समृद्ध करावे असे आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयातील डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, डॉ. जयश्री पाटील, प्रा. नितीन मुळे, सौरभ चव्हाण, अतुल मोरे, अमित राऊत, निखिल साबळे, ललित गोल्डे, नानासाहेब लावंड, योगेश शिंदे, रमेश कचरे, प्रशांत माटे लक्ष्मण खरात, इम्रान पठाण, सुखदेव पोटदुखे, प्रकाश बांगर, रामदास घोडके, तन्मय भावसार, कोठूळे, अर्जुन चव्हाण, गणेश कुऱ्हाडे तसेच प्रसन्न वैद्य, भगवंत देशपांडे, कैलास जाधव, रमेश जाधव, शिवकुमार मुक्तापुरे, अविनाश साळवे, सुनिता पारेकर, अलका कुलकर्णी, मधुकर राठोड व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन अलका कुलकर्णी यांनी केले हा कार्यक्रम, ग्रंथालय समितीचे सभासद, ग्रंथालय कर्मचारी यांच्या सहकार्यामुळे यशस्वीरित्या पार पडला.





॥ श्री गणेश चिंतन ॥

समर्थ रामदास स्वामी कृपेने मनाचे श्लोक व दासबोधाच्या आधाराने "गणेश उत्सवात १० दिवस नियमित एक गणेश चिंतन करू या कारण "जो स्वतः शुभ झाला तोच शुभारंभ करू शकतो"

कृतज्ञ मी कृतार्थ मी, भगवंत हृदयस्थ आहे 🙏 अपर्णा परांजपे कात्रज पुणे

सद्गुरुज्ञानाचा प्रकाश मात्र—"मी कोण?" या प्रश्नावर प्रकाश टाकतो.
बाहेरचे अंधार दूर करणे एक गोष्ट;
अज्ञानाचा "मी"च उघड करणे ही पूर्ण वेगळी गोष्ट.
म्हणून सूर्यापेक्षा सद्गुरुज्ञानप्रकाश थोर.
२. मग शेषनागाची उपमा?
आतां उपमावा फणीवर । तरी तोहि भारवाही ॥२२॥
फणीवर म्हणजे शेषनाग.परंपरेत शेषाला विश्वधारणेचे प्रतीक मानले जाते.म्हणून "ज्याच्यावर जगाचा भार आहे" अशी महानता सद्गुरूंना द्यावी असे वाटू शकते.
पण समर्थ म्हणतात—तोही "भारवाही" आहे.
म्हणजे त्याच्यावर अजूनही धारण करण्याचा भार आहे.
सद्गुरुतत्त्व मात्र—भार धारण करणाऱ्या विश्वाच्या पलीकडचे आहे.
ही उपमा नाकारण्याची पद्धत फार सूक्ष्म आहे.
समर्थ मोठ्या वस्तूला लहान म्हणत नाहीत.
ते फक्त सांगतात—जी वस्तू अजूनही विश्वव्यवहाराच्या कक्षेत आहे, ती मायातीत सद्गुरुतत्त्वाची पूर्ण उपमा होऊ शकत नाही.

३. मग पाण्याची उपमा?
आतां उपमे द्यावें जळ । तरी तें काळांतरीं आटेल सकळ ।
सद्गुरुरूप तें निश्चळ । जाणार नाहीं ॥२३॥
पाणी जीवनदायी.पाणी प्रवाही.पाणी शुद्ध करणारे.
पण—काळानुसार ते आटते.
सद्गुरुतत्त्व?"तें निश्चळ । जाणार नाहीं."
इथे "निश्चळ" हा शब्द फार महत्त्वाचा.
पाणी बदलते.शरीर बदलते.मन बदलते.विचार बदलतात.
ज्ञानाची साधनेही बदलतात.
पण आत्मस्वरूप—परिवर्तनाच्या साक्षीस्थानी असते.
म्हणून सद्गुरुतत्त्वाला नश्वर वस्तूची उपमा कशी चालेल?
४. अमृताची उपमाही अपुरी!
सद्गुरूसी उपमावें अमृत । तरी अमर धरिती मृत्यपंथ ।
सद्गुरुकृपा यथार्थ । अमर करी ॥२४॥
ही ओवी तर विलक्षण आहे.
अमृत म्हणजे अमरत्वाचे प्रतीक.पण समर्थ म्हणतात—
अमृत मिळाले तरी देहधारी "अमर" होईलच असे नाही.



वडील आणि मुलगी

आज करमरकर काकू एकट्या आहेत, थकल्या आहेत; पण बाप-लेकीच्या अलौकिक प्रेमाची ही साक्ष अजरामर अशीच आहे.
मुलगी मोठी होते, तिचे लग्न ठरते आणि एक दिवस ती हे घरटे सोडून सासरी निघून जाते. हा प्रसंग कोणत्याही पित्याच्या आयुष्यातील सर्वात मोठे अग्निदिव्य असते.
आयुष्यभर संकटांत कधीही न डगमगणारा, कठोर शिस्तीत वागणारा खंबीर बाप मुलीच्या पाठवणीच्या वेळी लहान बालकासारखा ओक्साबोक्सी रडतो, तेव्हा या नात्याची अथांग खोली जगासमोर येते. पंडित वसंतराव देशपांड्यांनी गायिलेले 'दाटून कंठ येतो' हे गाणे ऐकले की प्रत्येक बापाच्या आणि लेकीच्या डोळ्यांत आजही अश्रू उभे राहतात.
मुलगी सासरी जाते खरी, पण तिचा जीव मात्र माहेरी वडिलांच्या घरातच रेंगाळत असतो. संसारात रमूनही "बाबांचं जेवण वेळेवर झालं का?", "त्यांनी आजच्या गोळ्या घेतल्या का?", "त्यांची तब्येत ठीक आहे ना?" ही विचारपूस करणारा तिचा फोन आल्याशिवाय तिचा दिवस पूर्ण होत नाही. फोनवर वडिलांचा आवाज जरासा जरी खंतावलेला वाटला, तरी सासरी बसलेल्या लेकीचा जीव तळमळतो आणि ' वाटेनं माहेराच्या धावत मन जातं.'
कधी कधी घरात दुर्दैवाने आई नसते किंवा ती अकाली जग सोडून जाते; अशा वेळी मुलगा कदाचित संसारात हतबल होईल, पण मुलगी मात्र स्वतःच्या दुःखाला आवर घालून वडिलांची 'आई' होते!

श्रीरामरक्षास्तोत्र

मराठी भावानुवाद सहीत



भावानुवादकार - माधव मनोहर जोशी.

✍इत्येतानि जपन नित्यं मद्भक्तः श्रद्धयान्वितः
अश्वमेधाधिकं पुण्यं सम्प्राप्नोति न संशयः ॥२४॥
➡ मराठी भावानुवाद ---
ह्या श्लोकांचा जे मम भक्त,दररोज श्रद्धेने करती जप
तयांना निश्चित अश्वमेध यज्ञाहून पुण्य मिळते खूप ॥२४॥
✍रामंदूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् ।
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नरः ॥ २५॥
➡ मराठी भावानुवाद ---
दुर्वादलासम असे जयाचा श्यामल वर्ण
कमळासम जयाचे असती ते दिव्य लोचन
पीतवस्त्र धारी श्रीरामाचे नाम घेत जे करती स्तुती
अशा पुरुषांस मिळे जन्म मृत्यू फेऱ्यातून मुक्ती ॥२५॥
✍रामं लक्ष्मणपूर्वजम् रघुवरं सीतापतिं सुन्दरम् ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ॥ २६॥
➡मराठी भावानुवाद ---
रघुकुलश्रेष्ठ,लक्ष्मणाग्रज,सीतापती श्रीराम हे असती अतीव सुंदर
असती
ब्राह्मणप्रिय,ककुस्थकुलीन,गुणवान,धार्मिक करुणसागर ॥२६॥
✍राजेन्द्रं सत्यसन्धं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिम् ।
वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकम् राघवं रावणारिम् ॥२७॥
➡मराठी भावानुवाद ---
ते राजेंद्र,दशरथपुत्र,श्यामल शांतमूर्ती असती सत्यवान
लोकप्रिय,रघुकुलभूषण,रावणवैरी श्रीरामास करतो वंदन ॥२७॥
✍रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥ २८॥
➡ मराठी भावानुवाद ---
वंदितो मी श्रीरामाला,रामभद्राला,
रामचंद्राला
प्रजापतीला,
नाथाला,रघुनाथाला,सीतापतीला ॥२८॥
✍श्रीराम राम रघुनन्दन राम राम ।
श्रीराम राम भरताग्रज राम राम ॥
श्रीराम राम रणकर्कश राम राम ।
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥२९॥
➡ मराठी भावानुवाद ---
रघुकुलश्रेष्ठ असे आहेत प्रभू श्रीराम
भरताचे अग्रज आहेत हे प्रभू श्रीराम
रणांगणी शूर असे आहेत हे श्रीराम
त्यांना शरण जाऊन करतो मी प्रणाम ॥२९॥

मूल्यांची घसरण आणि राजकीय- सामाजिक विस्कळीतपणा ही गंभीर बाब

राजीव खांडेकर; पुणे पुस्तक जत्रेत श्रीकांत कात्रे यांनी घेतलेल्या प्रकट मुलाखतीला श्रोत्यांची दाद

ज्योतिर्मय साहित्य

पुणे – कायदेमंडळ, कार्यपालिका, न्यायव्यवस्था आणि माध्यमे हो लोकशाहीचे चार स्तंभ समाजातूनच येतात. समाजात चांगुलपणा वाढला तर हे स्तंभ मजबूत होतात. मात्र, सध्या समाज आणि माध्यमे राजकीय समर्थकांमध्ये विभागली गेली आहेत. सर्वच स्तंभांमधील नैतिक मूल्यांची घसरण आणि वाढता राजकीय- सामाजिक विस्कळीतपणा ही गंभीर चिंतेची बाब आहे, असे मत एबीपी माझा वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांनी व्यक्त केले.

'पुणे पुस्तक जत्रा' उपक्रमांतर्गत टिळक रोडवरील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये आयोजित करण्यात आलेल्या विशेष सत्रात ज्येष्ठ पत्रकार राजीव खांडेकर यांची 'मुशाफिरी पत्रकारितेची' या विषयावर ज्येष्ठ संपादक श्रीकांत कात्रे यांनी प्रकट मुलाखत घेतली. त्यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून साताऱ्याचे माजी नगराध्यक्ष आणि 'ऑल इंडिया ट्रान्सपोर्ट असोसिएशन'चे संचालक व माजी अध्यक्ष प्रकाश गवळी उपस्थित होते. साताऱ्यात भरलेल्या ६६ व्या अखिल भारतीय संमेलनाचे वेळी ते साताऱ्याचे नगराध्यक्ष होते. तसेच ज्येष्ठ पत्रकार प्रा. श्रीनिवास हेमाडे, ऋता बावडेकर, संजय भालेराव, दयानंद माने यांचीही कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली.



सांगली जिल्ह्यातील दुष्काळी आटपाडी तालुक्यातून शिक्षण घेतलेल्या खांडेकर यांनी प्रिंट, इलेक्ट्रॉनिक आणि डिजिटल अशा तिन्ही माध्यमांत काम करत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. या मुलाखतीत त्यांनी आपल्या चार दशकांच्या पत्रकारितेतील संघर्ष, अनुभव आणि सामाजिक बांधीलकीचा प्रवास उलगडला. पाचवी ते सातवीत असतानाच वाचन, लेखन आणि नाटकातील आवडीमुळे पत्रकार होण्याचा निर्णय घेतल्याचे खांडेकर यांनी सांगितले. विजय कुवळेकर यांच्या संपादकपदाच्या काळात 'सकाळ'मध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून रुजू झालेल्या खांडेकर यांनी नाशिकमध्ये पत्रकारितेची खरी पायाभरणी झाली. त्याकाळात केलेल्या संघर्षामुळे खूप काही शिकता आले, असे त्यांनी स्पष्ट केले. दिल्लीत काम करण्याची संधी १९९५ मध्ये मिळाल्यानंतर कावेरी पाणीप्रश्न, काश्मीर मुद्दा यांसारख्या राष्ट्रीय विषयांचे वार्तांकन केल्याने आपल्या विचारांचा आवाका व्यापक झाला. दिल्लीतील पाच वर्षांच्या कालावधीत चार पंतप्रधान बदलताना पाहिले. राष्ट्रीय पातळीवरील नेते, मंत्री व खासदारांशी संवाद साधल्याने अनुभव आणि नेटवर्किंग वाढले. मात्र, केवळ राजकीय वार्तांकनात अडकून न राहता समाजासाठी ठोस योगदान देण्याच्या हेतूने दिल्लीतून पुन्हा महाराष्ट्रात आल्याचे त्यांनी नमूद केले. पुस्तक खरेदीतील गैरव्यवहार उघडकीस आणणे तसेच अंबेजोगाई मेडिकल कॉलेजमधील गंभीर दुरवस्थेवर थेट वार्तांकन करून प्रशासन हलवणे, असे सामाजिक परिणाम साधणारे विषय त्यांनी मांडले.

समाजातील प्रेरणादायी व्यक्तींना लोकांसमोर आणण्यासाठी 'माझा कट्टा' उपक्रम सुरू केला. 'माझा कट्टा'वर अभिनेते नाना पाटेकर यांनी शेतकरी आत्महत्यांवर व्यक्त केलेली आर्त भावना व आवाहनातून पुढे 'नाम फाउंडेशन'ची स्थापना झाली, ज्यामुळे हजारो शेतकऱ्यांना व दुष्काळी भागांना मदत झाली, असे त्यांनी सांगितले. पत्रकाराने स्वतःला 'समाजाचा वकील' मानले पाहिजे. समाजात काही चांगले घडते त्याचा पुरस्कार करणे आणि वाईट किंवा अन्यायाविरुद्ध ठामपणे उभे राहणे हाच पत्रकाराचे मूलमंत्र आहे. सध्या डिजिटल व सोशल मीडियामुळे मुख्य प्रवाहातील माध्यमांची मक्तेदारी संपली असून, ध्रुव राठीसारख्या उदाहरणांवरून स्पष्ट होते की स्वतःचे स्वतंत्र विचार मांडण्यासाठी आता प्रत्येकाकडे व्यासपीठ उपलब्ध आहे, असे खांडेकर यांनी नमूद केले.

शिरीष चिटणीस यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ''पुणे पुस्तक जत्रा' अंतर्गत ''पुस्तकांच्या गराड्यात जाऊन'' लेखक, कवी आणि पत्रकारांनी रसिकांशी संवाद साधावा, या संकल्पनेतून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पुस्तक जत्रेतील सर्वात महत्त्वाची व मुख्य मुलाखत म्हणजे श्रीकांत कात्रे यांनी घेतलेली राजीव खांडेकर यांची प्रकट मुलाखत होय.

श्रीकांत कात्रे आणि राजीव खांडेकर यांनी पत्रकारितेच्या सुरवातीच् काळात एकत्र काम केले आहे. खांडेकर यांची व्याप्ती केवळ महाराष्ट्रापुरती नसून राष्ट्रीय पातळीवर आहे. प्रचंड वाचन आणि अभ्यासाच्या जोरावर त्यांनी संगीत, नाट्य व राजकारण अशा विविध क्षेत्रांतील दिग्गजांना अभ्यासू पद्धतीने बोलते केले आहे.'' कार्यक्रमास राजीव खांडेकर यांच्यासारख्या राष्ट्रीय स्तरावरील व्यक्तिमत्त्वाला प्रत्यक्ष पाहणे व ऐकणे ही उपस्थित शालेय विद्यार्थ्यांसाठी मोठी स्फूर्ती ठरली. कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग व तांत्रिक व्यवस्थापन पाहणारे बाळकृष्ण इंगळे सर तसेच शिक्षिका शैला मॅडम यांचा विशेष गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे निमंत्रक पी. एन.आर. राजन (संयोजक) आणि शिरीष चिटणीस (समन्वयक) यांनी उपस्थितांचे आभार मानले.

रुप बदलते तत्व नाही...!!

ज्योतिर्मय साहित्य

कधी कधी मन अगदी निवांत असतं. निराकारी वृत्तीन ते घरट्यात बसून पापणी लावून बसतं. आसमंतही स्वच्छ सुंदर आणि शांत असतं. पण अचानक नीरव शांततेत विचारचक्र फिरायला लागतं, सुप्तावस्तेतील तरंग निर्माण होऊन हृदय स्पंदनी कुणीतरी साद घालीत आहे असा भास होतो. असेच काहितरी त्या निवांत क्षणी घडलेले होते. घातलेली साद कुणी व्यक्तीची नव्हती तर ती एका आध्यात्मिक ग्रंथातील अनुभूतींची होती. अनवधानाने हाती पडलेल्या ''बा विठ्ठला'' या ग्रंथातील भक्तीभावाने परिपूर्ण असलेल्या एका आध्यात्मिक आशययुक्त कवितेची होती.



अॅड. डॉ. नीताताई कचवे, साहित्यिक क्षेत्रातील सुप्रसिद्ध नाव, सतत धडपड करणारं, काहितरी वेगळ करुन दाखविणारं असं वैशिष्टपूर्ण नावं आणि त्यांचेच कल्पना विश्वातून साकारलेला व श्री चरणी अर्पण केलेला प्रातिनिधिक आध्यात्मिक ग्रंथ,''बा विठ्ठला.'' अनेक प्रतिभावंत कवींच्या उत्स्फूर्त भावस्पर्शी अलौकिक अशा अभंग रचना नी सोबतच अतिशय हृदयस्पर्शी असलेल्या कवितेने समृद्ध असलेला हा ग्रंथ साहित्य क्षेत्रात खरोखरच एक मौलिक ठेवा असल्याचे दिसून येत आहे. ग्रंथामधील सर्व प्रतिभासंपन्न असलेल्या रचना गुणगुणत असतांना एका वैशिष्टपूर्ण कवितेवर नजर स्थिरावली, एकदा नव्हे दोनदा नव्हे तर कित्येक आवर्तने झाली आणि हळूहळू आशयसंपन्न असलेल्या कवितेतील एक एक पैलू आत्मसात व्हायला सुरुवात होत मनाला दिव्य साक्षात्कार झाल्याची अनुभूती झाली. ''रुप बदलते तत्व नाही,'' असे आशययुक्त कवितेचे शीर्षक काहिसे आगळे वेगळे असून उत्कंठावर्धक भासत होते. सुरवातीला असलेल्या दोन ओळी मनाचा ठाव घेण्यास अतिशय समर्थ भासत होत्या.

मुकुट तो सोडून आला, विटेवर उभा राहिला
द्वारकेचा देव माझा, पंढरीचा विठ्ठल झाला

महाराष्ट्राचे आद्य दैवत सर्वसामान्य जनतेचे भक्ती रुपक श्री विठ्ठल हे भगवान श्रीकृष्णाचे प्रतिरुप आहे हे सर्वश्रुत जरी असले तरी श्रीकृष्ण हे द्वारकेचे राजे होते मात्र खऱ्या अर्थाने सामान्याचे प्रतिपालक होते. भक्त पुंडलिकाचे भक्तीने प्रसन्न होऊन ते अतिशय साधे रुप घेऊन राजमुकुट बाजूला सोडून भेटायला आले, एवढेच नव्हे तर कोणत्याही आसनाचा स्विकार न करता भक्ताचे प्रेमापोटी द्वारकेचा हा जनकल्याणी राजा, ऐश्वर्याचा त्याग करुन पंढरीच्या विठ्ठल रुपात अवतरुन युगे अठ्ठावीस विटेवर उभा झालेला आहे.

तिथे होती ओठांवरती, संमोहक बासरी
इथे नाम घेऊनी ओठी, भक्तांसाठी थांबला

भक्तांसाठी परमात्मा सर्व मायावी उपभोगी जगताचा त्याग करुन भक्तांची जीवन प्रणाली आनंदाने स्विकारून समाधानी होतो. संपूर्ण विश्वाला संमोहित करणारी ती त्याची अत्यंत जीवाभावाची सुरेल बासरी सुध्दा योगेश्वर श्रीकृष्णाने ओठावरून दूर केली व केवळ भक्तांसाठी कर कटेवरी ठेवून युगायुगान्वये भेटीची प्रतिक्षा करित आहे. किती समर्पित आणि उदात्त भावना येथे त्या जगत् पिता परमात्याची प्रकट झालेली आहे. श्री विठ्ठलांचे स्वरुपच असे साधेभोळे आहे.



प्रतिभावंत कवियित्री आर्णा कचवे यांना असलेच निरपेक्ष, निस्पृह भावविभोर विश्व येथे या दोन कडव्यांमध्ये अपेक्षित आहे असे दिसून येते.

सांगितली तिथे गीता, अर्जुनाचे रथावरी
ज्ञानेशाच्या, तुकोबाच्या, हृदयात तो विरघळला

श्रीकृष्ण म्हणजे चतुर आणि धूर्त राजकारणी, महाभारतात रणांगणावरील आप्तेष्ट बघून अर्जुनाचे मन विचलीत झाले तेव्हा गीतेच्या माध्यमातून श्रीकृष्णाने त्याला उपदेश करुन जीवन सार समजावून सांगीतले. एवढेच नव्हे तर रथाचे सारथ्य करुन रणांगणावर लढण्याचे सामर्थ्य आणि प्रेरणा दिली. पण जेव्हा तो ज्ञानोबा आणि तुकोबांचे हृदयामध्ये श्री विठ्ठल रुपात नी स्वरुपात स्थानापन्न होतो तेव्हा मात्र एक राजकारणी म्हणून नव्हे तर माऊली म्हणून केवळ आस्था आणि ममतेच प्रतिक म्हणून विरघळून जातो.

(क्रमशः)

आंतरराष्ट्रीय महिला किसान दिना निमित्त संगीता ठलाल यांचा सत्कार

ज्योतिर्मय साहित्य



कुरखेडा – वनामती नागपूर येथे १५ तारखेला आंतरराष्ट्रीय महिला किसान दिनाचे औचित्य साधून विभागीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सोबतच कृषी क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांच्या सत्कार समारंभाचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. तसेच प्रत्येक जिल्ह्यातील दोन महिलांची निवड करण्यात आली होती. गडचिरोली जिल्ह्यातील हेमलता सोनटक्के मु.येवली आणि साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल मु. देऊळगाव /कुरखेडा यांची सत्कारमूर्ती म्हणून निवड करण्यात आली होती. संगीता ठलाल ह्या एक शेतकरी महिला असताना सुद्धा साहित्य क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहेत, सामाजिक उपक्रम सुध्दा नि:स्वार्थ भावनेने राबवत असतात. विशेष म्हणजे त्यांची ''रानभाज्यांची अभ्यासक म्हणून सर्वच स्तरावर ओळख आहे. ''रानभाज्यांच्या जगात'' या प्रकारचा संशोधन ग्रंथ काढून समाजासाठी बहुउपयोगी मोलाचे योगदान दिले आहेत. एवढेच नाही तर बोलीभाषा टिकून रहावी यासाठी सुद्धा झाडीबोली भाषेतील ''झाडीचा खाजा'' काव्यसंग्रह लिहून बोलीभाषेला जिवंत ठेवण्याचे काम केले आहेत. आजपर्यंत तालुकास्तरीय रानभाजी महोत्सवात त्यांचा सत्कार झालेला आहे सोबतच जिल्हा स्तरीय रानभाजी महोत्सवात त्यांना प्रमुख वक्ते, परीक्षक म्हणून सुद्धा आमंत्रित करण्यात आले होते.

राज्यमंत्री, गडचिरोली जिल्ह्याचे सहपालकमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी संगीता ठलाल यांच्या ''रानभाज्यांच्या जगात'' या संशोधन ग्रंथाचे महत्व जाणून समाजासाठी मोलाचे कार्य केले आहेत बघून त्यांचे अभिनंदन केले होते व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार सुद्धा केले होते. संगीता ठलाल यांचे योगदान समाजासाठी फारच मोलाचे आहेत व रानभाज्यांची त्या अभ्यासक असल्यामुळे त्यांची दखल भारत सरकारच्या साहित्य अकादमी ''ग्रामलोक'' या कार्यक्रमात झाली तसेच दूरदर्शन सह्याद्री वाहिनीवर, रेडीओ आकाशवाणी केंद्र नागपूर येथे मुलाखत झालेली आहे. आंतरराष्ट्रीय किसान दिनाच्या विभागीय कार्यशाळा या भव्य अशा कार्यक्रमात नावाजलेल्या मान्यवरांच्या हस्ते संगीता ठलाल यांना पुष्पगुच्छ, शाल,श्रीफळ, सन्मानचिन्ह, प्रशस्तिपत्र देऊन त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. विशेष म्हणजे हा सत्कार संगीता ठलाल यांनी आपल्या मुळ गाव देऊळगाव येतील शेतकरी महिलांना सोबत घेऊन स्वीकारला, त्यावेळी मंचावर उपस्थित असलेले आशा पठाण संचालक वनामती, प्रगतशील शेतकरी सुनिता वाधवा, डॉ.रेणुका माहेदे, डॉ.सरिता मोडे, आणि अन्य मान्यवर उपस्थित होते. हा शासकीय भव्य सत्कार माझ्यासाठी प्रोत्साहन देणारा आहे म्हणून संगीता ठलाल यांनी तालुका कृषी विभागाचे, जिल्हा कृषी विभागाचे सोबतच प्रकल्प संचालक आत्मा प्रीती हिरळकर,व रवी हरणे प्रकल्प उपसंचालक आत्मा गडचिरोली आणि प्रकल्प अधिकारी (आत्मा) नागपूर तथा अधिक्षक कृषी अधिकारी, विभागीय कृषी सहसंचालक, नागपूर व त्यांच्या संपूर्ण टिमचे आभार मानले.

एका सामान्य शेतकरी, गृहिणी असलेल्या संगीता ठलाल यांचा आंतरराष्ट्रीय किसान दिनाच्या निमित्ताने विभागीय स्तरावर सत्कार झालेला बघून व जिल्ह्याचे नाव मोठे केले यासाठी सर्वच स्तरावरून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.



कुटुंबप्रमुख हवा आहे! भाग १० : मनाचे नियम

ज्योतिर्मय साहित्य

आपण मनाच्या नियंत्रणाबाबत बोलत होतो. त्यासंबंधी पातंजल योगसूत्रांचा थोडक्यात परिचय करून घेतला आणि त्या अनुषंगाने समर्थ रामदास स्वामींच्या मनाच्या श्लोकांबद्दल थोडी चर्चा केली. आता आपण मनाच्या श्लोकांविषयी अधिक जाणून घेऊ या.

'आजोबा, मनाचे श्लोक म्हणजे एक मोठी कविता ना?' श्रुतकीर्तीने विचारले.

'अगदी बरोबर! मनाचे श्लोक हा एक मोठा काव्यसंग्रह आहे.'

'आजोबा, त्यात किती स्टॅन्झा आहेत?' श्रुतकीर्तीने विचारले.

'बेटा, स्टॅन्झा नव्हे, त्याला मराठीत कडवे म्हणतात.'

'कडवे म्हणजे काय, आजोबा?' श्रीरामने विचारले.

'मुलांनो, कडवे म्हणजे कवितेतील काही ओळींचा लयबद्ध आणि अर्थपूर्ण समूह. मनाच्या श्लोकांमध्ये प्रत्येक श्लोक चार ओळींचा आहे. तुम्हाला ऋचा म्हणजे काय, माहीत आहे का?' आजोबांनी विचारले.

'माहीत आहे, आजोबा!' श्रीराम म्हणाला.

'अरे वा! मग सांग बरं, रुचाचा अर्थ काय?'

'आजोबा, ऋचा माझ्या वर्गात आहे ना! ती एक मुलगी आहे,' श्रीराम म्हणाला.

'श्रीराम, तुझे उत्तर एका अर्थाने बरोबर आहे. ऋचा हे मुलीचे नावही आहे; पण या शब्दाचा आणखी एक महत्त्वाचा अर्थ आहे,' आजोबा म्हणाले.

'तो काय, आजोबा?' श्रुतकीर्तीने विचारले.

'मुलांनो, ऋग्वेद हा जगातील प्राचीनतम ग्रंथांपैकी एक आहे. त्यातील मंत्ररूप रचनांना ऋचा म्हणतात. आता आपण समर्थ रामदासस्वामींच्या मनाच्या श्लोकांकडे वळू या.'

'म्हणजे समर्थ रामदास स्वामींचे मनाचे श्लोक ना?' श्रीराम आणि श्रुतकीर्तीने एकाच वेळी विचारले.


'बरोबर! मनाच्या श्लोकांच्या प्रचलित संग्रहात एकूण २०५ श्लोक आहेत.'

'म्हणजे किती ओळी आणि किती शब्द, आजोबा?' श्रुतकीर्तीने विचारले.

'प्रत्येक श्लोकात चार ओळी असल्यामुळे एकूण ८२० ओळी होतात. शब्दसंख्या साधारण ४,१०० असल्याचा अंदाज आहे.'

'चार हजार शंभर शब्द!' श्रुतकीर्तीने आश्चर्याने विचारले.

'हो!'



'मग आजोबा, इतके श्लोक शिकायला खूप वेळ लागेल आणि ते फक्त मराठीतच आहेत का?' श्रीरामने विचारले.

'मनाचे श्लोक समर्थ रामदास स्वामींनी मूळ मराठीतच लिहिलेले आहेत. त्यांचे इंग्रजी आणि संस्कृत अनुवादही उपलब्ध आहेत.'

'आजोबा, हे सगळे समजून घेण्यासाठी काही शॉर्टकट नाही का?' श्रीरामने विचारले.

'शॉर्टकट नाही; पण एक उपाय आहे.'

'काय उपाय, आजोबा?' छोट्या श्रुतकीर्तीने विचारले.

'आपण सोयीसाठी या २०५ श्लोकांपैकी निवडक १२ श्लोकांचा अभ्यास करू शकतो. मात्र, सर्व श्लोक वाचल्यावर जे समजेल, ते सर्व या १२ श्लोकांतून समजेलच, असे सांगता येणार नाही.'

'बरं, मग सांगा ना, ते १२ श्लोक कोणते?' श्रीरामने विचारले.

'श्रीराम, आता बराच वेळ झाला आहे. तुमचा अभ्यासही बाकी आहे. आधी अभ्यास पूर्ण करा आणि झोपायला जा. उद्या आपण त्या १२ श्लोकांचा अभ्यास सुरू करू. शुभरात्री!'

'शुभरात्री, आजोबा!' श्रीराम आणि श्रुतकीर्ती म्हणाले.

क्रमशः भाग ११ : मनाच्या श्लोकांचा गाभा १२ श्लोक

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी–चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559

नवरात्र नवदुर्गा आणि स्त्री जन्माच्या नऊ अवस्था....

ज्योतिर्मय साहित्य

शारदेय नवरात्र उत्सव म्हणजे जणू आनंद, श्रद्धा भक्ती व उल्हासाचा कालावधी होय. नवरात्र नवदुर्गा उत्सवा अंतर्गत जिकडे तिकडे पूर्ण भारतभरच नाही तर जगभर उल्हास आणि उत्साहाने हा उत्सव साजरा केला जातो विविध राज्यात आपापल्या वैविध्यपूर्ण रितीरिवाजांनी घराच्या स्वच्छते पासून आरोग्यापासून पंचमहाभूतांच्या, अखंड विश्वाच्या मांगल्ये स्वरूपाचे चिंतन प्रत्येक घरातील स्त्री करते.

किती जरी विज्ञानाच्या गाथा आपण गात असलो तरी कुठेतरी डार्क होल, बीग बँग थेअरी, मिल्की वे गॅलक्सी ह्या मानवी जीवनाची रहस्य कायम ठेवतात.

सर्वसामान्यपणे सजीव बाल,युवा व वृद्ध या तीन अवस्था तून आपलं जीवन चक्र मार्गक्रमित करत असतो. त्यातही सृजनत्वाचे स्वरूप आदिमाया म्हणजेच स्त्री ही नऊ अवस्थातून आपले जीवन व्यतीत करते आणि ते प्रत्येक स्त्रीच्या जीवनाच्या नऊ अवस्था म्हणजेच नवदुर्गा स्वरूप होय हे आपण मान्य करायला हव्यात. त्या खालील प्रमाणे

शैलपुत्री – शैलपुत्री म्हणजे हिमालयाची कन्या म्हणजेच स्त्रीची बालिका अवस्था. अजान, अल्लड आई वडिलांच्या अंगा खांद्यावर खेळणार बालिका स्वरूप म्हणजेच शैलपुत्री होय. आई-बाबा कडून प्राप्त नव ऊर्जेला आई-वडील वळण देण्याचे कार्य करत असतात ती बालिका अवस्था म्हणजे खऱ्या अर्थानं शैलपुत्री होय

ब्रह्मचारिणी –ब्रह्मचरणी म्हणजे जप, तप साधना करणारी माता पार्वतीची अवस्था म्हणजेच आजची शाळेत जाणारी विद्यार्थिनी अवस्था अभ्यासातून एकाग्रतेने ज्ञान,कौशल्य विनम्रप्रेंपणे अवगत करणारी ब्रह्मचर्य पालन करणारी, कुमारीका अवस्था म्हणजेच ब्रह्मचारणी होय.

चंद्रघंटा –चंद्रासारखं शितल व मोहक स्वरूप असणारी देवी म्हणजे चंद्र घंटा होय स्त्री जीवनातील मोहक,सुंदर, सुशील, सुशिक्षित, उपवर चरित्र संपन्न युवतीचि अवस्था होय. आई-वडिलांच्या स्वाभिमानाचा प्रतीक सन्मानाचं प्रसन्नतेच स्वरूप म्हणजेच चंद्रघंटा स्वरूप होय.

कुष्मांडा– कुष्मांडा म्हणजे प्रचंड ऊर्जेचा स्त्रोत असणारी नवब्रमंडाला उत्पन्न करणारी देवी म्हणजेच स्त्रीची गरोदर मातेची अवस्था होय. जिने आपल्या उदरात नव उर्जा निर्मिती, पालन, पोषण करणारी स्त्रीची गर्भधारण केलेली अवस्था म्हणजेच कुष्मांडा अवस्था




होय.

स्कंदमाता– स्कदमाता म्हणजे नवरात्रीतील पाचव नवदुर्गा स्वरूप होय. स्कंदमाता म्हणजे आपल्या कार्तिकेला ओटी पोटाशी धरून दूध पाजणारी,जीवनदान देणारी देवीचे स्वरूप होय. म्हणजेच प्रत्यक्षात स्कंदमाता म्हणजे करुणा, दया, माया, ममता, ममतेचे स्वरूप. आपल्या बाळाला ओटी पोटाशी धरून दूध पाजून तृष्णा शमवणारी नवउर्जेचे पालन पोषण करणारी वळण लावणारी मातृ स्वरूप स्कंदमाता होय.

कात्यायनी– कात्यायनी ऋषी कात्यनाची कन्या म्हणजेच कर्तव्य, कर्तृत्व, कर्मठ गतिशील पणे आपल्या परिवारासाठी तीळ तीळ जमा करणारी उपक्रमशील गृहिणी परिवाराची काळजी घेणारी स्त्री अवस्था म्हणजेच कात्यांयनी अवस्था होय. जी आपल्या संसारात हवे असणाऱ्या नको असणाऱ्या ऊर्जांना प्रति जागरूक असणारी काळजी घेणारी सजग गृहिणींची अवस्था म्हणजेच कात्यायनी होय. आपल्या संसाराचं जाळ निग्रहाने तटस्थपणे गतिशीलतेने विणणारी स्त्री अवस्था म्हणजेच कात्यायनी होय.

काल रात्री – नवरात्रीतील आठव्या दिवशी आठव्या रात्री जिचे पूजन केले जाते अशी असुरांचा रौद्र स्वरूपा ने प्रचंड, संपूर्ण उर्जेने विनाश करणारी व आपल्या परिवाराचे वाईट गोष्टींपासून रक्षण करणारीदेवी म्हणजे काल रात्री होय

जी आपल्या परिवाराचे आपल्या समाजाचे वाईट चालीरीतींपासून वाईट दुष्ट ऊर्जांपासून रक्षण करणारी सदैव सजग राहून प्रचंड व संपूर्ण ऊर्जेने सुशील पणे संकटांवर मात करणारे स्त्री यांचे स्वरूप म्हणजेच काल रात्री होय. आज खूप मोठ्या प्रमाणामध्ये अनेक स्त्रिया या काल रात्री चे रूप धारण करून आपल्या परिवाराला समाजातील भ्रष्ट व्यवहारापासून दूर ठेवणारे साम,



दाम, दंड, भेद यांचा उपयोग करून आपल्या कुटुंबाचे रक्षण करणारी स्त्री जन्माची अवस्था तसेच मुलांना वळण लावणारी संस्कार शिकवणारी, दृढपणे संसाराची धुरा सांभाळणारी अवस्था म्हणजेच काल रात्री माता होय.

महागौरी – महागौरी हे देवीचे, निर्मळ, सोज्वळ, शांत स्वरूप होय तर स्त्री जीवनातील संकटांवर मात करून अंततः सौजन्यशील, शांत, सोज्वळ निर्मळ प्रेमळ,कर्तृत्ववान,आपल्या मुलाबाळांच्या कर्तृत्वाला पाठबळ देणारी एक सजग माता, सौजन्यशील स्त्रीची अवस्था म्हणजेच महागौरी ची अवस्था होय जीवनातील विविध अनुभवातून ध्येयपूर्ती करून शांततेकडे संयमाने प्रस्थान करणारी मानवी स्त्रीची अवस्था म्हणजेच महागौरी होय.

सिद्धधात्री–सिद्धधात्री नवदुर्गातील नवमीच्या दिवशी पूजन केली जाणारी देवी म्हणजेच सिद्धधात्री होय.आपल्या आयुष्यातील गोड कडू अनुभवांतून प्रगल्भ तेणे स्थिरतेने अचूक,भविष्याचा वेध घेण्याची सिद्धता प्राप्त स्त्रीची अवस्था म्हणजेच सिद्धी धात्री होय जी आपल्या आत्मसाक्षात्काराने पुढील पिढीला चिरत्व, स्थिरत्व, शुभ आशीर्वादांचा, सर्व मांगल्याचा खजिना प्रदान करत स्वतः मुक्तीच्या मार्ग समाधानाने पादक्रांत करणारी स्त्रीची अवस्था म्हणजेच सिद्धधात्री होय.

प्रत्येक स्त्रीला या नऊ ही अवस्थेतून अतिशय सजगतेने सौजन्य आणि सहनशीलतेने, संयमाने जावे लागते त्यातूनच तिचं आयुष्य विविध रंगांनी रंगवलं जातं तर विविध गुणांनी गायलं जातं. व तसेच ती सक्षम नव पिढी निर्माण करू शकते.

सुशिक्षित व सजग पालक म्हणून आपण आपल्या घरातील प्रत्येक स्त्रीच्या या नऊ अवस्थांचा आदर करायला हवा. आज समाजातील अनेक विकृत वृत्ती या अवस्थांना छिन्न विच्छीन्न करून स्त्री तत्व विनाशाकडे मानवी जीवन जात आहे. स्त्रीभ्रूणहत्य, बालविवाह,, दासी प्रथा, स्त्रियांना उच्च शिक्षणापासून वंचित ठेवणे, लहान वयातच लहान पोरींना पळवून नेऊन वाईट व्यवसायाला लावणे, स स्वेराचारी, समलैंगिकता, स्वावलंबनाच्या नावाने लग्न न करणे, मातृत्व विरोध, तसेच प्रेमाच्या नावाखाली तिचा बळी घेणे अशा एक ना अनेक विकृत परंपरांनी समाज अजूनच भ्रष्ट होत चाललेला आहे. या नवरात्रीत आपण या सर्व स्त्रियांच्या नऊ अवस्थांचे रक्षण करण्याचा संकल्प करायला हवा तरच खऱ्या अर्थाने हाच नवचंडीका यज्ञ ठरेल. मानवी जीवन योग्यरित्या अखंड,अविनाशी पणे यशस्वी होईल.

सर्वांना नवदुर्गा नवरात्र महोत्सवाच्या हार्दिक शुभेच्छा...

राखाडी करडा रंग : नश्वरता वैराग्य आणि मुक्तीचे प्रतीक

ज्योतिर्मय साहित्य


शारदीय नवरात्र उत्सवातील करड्या (राखाडी) रंगाचा संबंध देवी चंद्रघंटा (काही पंचांगानुसार तिसऱ्या किंवा विशिष्ट दिवसाच्या क्रमाने) किंवा माता कालरात्री देवीशी जोडला जातो.

करडा किंवा राखाडी रंग हा समतोल,संयम आणि धैर्याचे प्रतीक मानला जातो.राखाडी रंग हा प्रकाश आणि अंधार, सुख आणि दुःख यांसारख्या दोन टोकांच्या स्थितीतील मध्यस्थता अथवा त्या समतोल दर्शवतो. राखाडी रंग हा साधेपणाच्या किंवा शांततेच्या मागे अस्तित्वात असलेली प्रचंड आंतरिक व्यक्ती आणि ताकद, परिपक्वता दर्शवतो.

मानसशास्त्रानुसार आंतरिक चंचलता दूर करणारा व मानसिक स्थिरता आणि शांतता निर्माण करणारा हाच राखाडी किंवा करडा रंग असल्याचे मानले जातेहा रंग मनाला शांत करतो, तणाव कमी करण्यास मदत करतो आणि सर्व परिस्थितीमध्ये वैचारिक स्थिरता जपण्यास मोलाची मदत करतो.

या राखाडी करड्या रंगाला परिपक्वता,





बुद्धिमत्ता आणि अनुभवाचे प्रतीक मानले जाते जसे की मेंदूच्या रचनेत असणारा ग्रे मॅटर.

राखाडी रंग हा काळा आणि पांढरा या दोन रंगाच्या मधला असल्यामुळे तो अंधकाराकडून प्रकाशाकडे किंवा अज्ञानाकडून ज्ञानाकडे रूपांतरण प्रक्रियेचा चा प्रतीक असा आहे.

महाराष्ट्रातील दगड हे करड्या रंगाचे आहेत, महाराष्ट्राचे प्रमुख दैवत, करोडो भाविकांचे श्रद्धास्थान असलेली पंढरपूरची विठ्ठलाची मूर्तीही करड्या रंगाची आहे. म्हणूनच या ठिकाणी या रंगाला विशेष सर्वाधिक असे महत्त्व प्राप्त होते

करडा किंवा राखाडी रंगाचा पोत असलेल्या दगडात निर्माण केलेल्या सर्व धर्मातील सर्व मूर्ती या आपापल्या स्थानी विशेष महत्त्व प्राप्त करून आहेत. करडा किंवा राखाडी रंग हा संसारीक भौतिक नश्वरतेचे प्रतीकही मानला जातो. शिवशंभो शंकराच्या देहावरील भस्म देखील राखाडी रंगाचेच असते. भस्म म्हणजे जळाल्यानंतर उरलेली राख. हे मानवी शरीराच्या आणि जगाच्या नश्वरतेचे प्रतीक आहे. हा संसार क्षणभंगुर असून शेवटी सर्व काही राखेमध्ये विलीन होणार आहे, हे भस्म म्हणजेच राखाडी रंग दर्शवते.

भगवान शंकर हे संन्यासी आणि योगी आहेत. इतर देवतांप्रमाणे ते सोन्या-चांदीचे अलंकार घालत नाहीत, तर भस्म धारण करतात. यातून ते जगातील मोह-माया, अहंकार आणि आसक्ती नष्ट करण्याचा संदेश देतात. मानवी जीवनाचा प्रमुख उद्देश अर्थात वैराग्य आणि मुक्ती मार्ग दर्शवणारा हा रंग आहे.

"वाचन प्रेरणा" दिन निमित्त पीएमश्री मौ.आझाद विद्यालयात विद्यार्थ्यांनी तीन तास वाचन

ज्योतिर्मय साहित्य

वैजापूर – माजी राष्ट्रपती कै. डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचा जन्म दिन वाचन प्रेरणा दिन म्हणून वैजापूरातील पालिकेच्या पीएमश्री मौलाना आझाद विद्यालयात गुरुवार (ता,१५)रोजी शालेय विद्यार्थ्यांनी शाळेच्या पटांगणात बसून शालेय वाचनालयातील विविध विषयांवरील पुस्तकांचे तीन तास वाचून करून डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांना अभिवादन केले. या प्रसंगी सेवा निवृत्त शिक्षणाधिकारी धोंडीरामसिंह राजपूत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते, त्यांनी प्रथम डॉ.कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मुख्याध्यापक बी.बी.जाधव अध्यक्ष स्थानी होते. वाचनाचे विद्यार्थी जीवनातील महत्व व वाचन केल्याने मिळणारी वाचन अनुभव संपन्नता विकसनशील आयुष्यात कशी उपयुक्त ठरते, याबाबत राजपूत व जाधव यांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले.श्री जाधव डॉ. कलाम यांच्या जीवनातील अनेक अनुभव कथन करून वाचन का?महत्वाचे आहे हे विशद केले, कवी धोंडीरामसिंह राजपूत यांनी ''वाचू,वाचू , वाचू पुस्तके आपण वाचू,जीवनात सारेज्ञान आपण साचू'' ही त्यांची कविता गाऊन वाचन महत्व विशद केले.

गुरुवार ता.१५ ऑक्टोबर हा दिन जगात ''हात धुवा दिन'' म्हणूनही साजरा करतात, हाताच्या स्वच्छतेचे महत्व ही वक्त्यांनी आपल्या विचारातून व्यक्त केले.

याप्रसंगी सूत्र संचलन सुवर्णा बोर्डे यांनी केले तर आभार श्री. तगरे यांनी मानले. शिक्षक सुभाष गोमलाडू, संदीप शेळके, वैशाली पगारे (शेलार), राजश्री बंड, मनीषा सोनवणे, श्रीमती राजपूत, ज्योती दिवेकर,लता सुखासे,सुनीता वसावे,पल्लवी भाकरे, क्रीडा शिक्षक बोढरे यांनी सहभाग नोंदविला.

तरुणाई, प्रेम आणि हिंसा

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

हिंसक प्रवृत्ती वाढण्यामागे आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे बदलती जीवनशैली, आहारपद्धती आणि झोपेच्या सवयी. आज शाकाहारी असो वा मांसाहारी, अन्नातील भेसळ आणि गुणवत्तेतील बदल याबाबत चिंता व्यक्त केली जाते; अशा आहारातील बदलांचा शरीरावर तसेच मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ शकतो, त्यामुळे त्याकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. त्याचबरोबर शरीरयष्टी आणि स्नायू वाढवण्याच्या नादात व्यायामशाळांमध्ये काही तरुणांकडून प्रथिने किंवा इतर पूरक पदार्थांचा वापर केला जातो; विशेषतः वैद्यकीय सल्ल्याशिवाय घेतले जाणारे काही हार्मोनल पदार्थ किंवा स्टेरॉइड्स आरोग्यावर आणि मनःस्थितीवर विपरीत परिणाम करू शकतात. यासोबतच रात्रीची अपुरी झोप, सततचा मोबाईलचा वापर, सामाजिक माध्यमांमध्ये गुंतून राहणे, सतत विचार करत राहणे आणि त्यातून निर्माण होणारी चिडचिड यांचाही भावनिक संतुलनावर परिणाम होऊ शकतो. सततचा ताण, झोपेचा अभाव आणि असंतुलित जीवनशैली यामुळे व्यक्तीच्या संयमावर आणि भावनिक नियंत्रणावर परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे तरुणांच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्याकडे पाहतांना केवळ शिक्षण आणि करिअरपुरते मर्यादित न राहता संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप, मर्यादित मोबाईल वापर आणि निरोगी जीवनशैली यांनाही तितकेच महत्त्व देणे आवश्यक आहे.

आज पालक मुलांच्या शिक्षणाबद्दल, गुणांबद्दल आणि करिअरबद्दल बोलतात; पण प्रेम, आकर्षण, प्रेमभंग, नकार, लैंगिकता, राग, असुरक्षितता आणि भावनिक ताण याबद्दल मोकळा संवाद किती घरांमध्ये होतो? मुलाच्या वागण्यात अचानक बदल झाला, तो चिडचिड करू लागला, एखाद्या व्यक्तीचा सतत पाठलाग करू लागला किंवा 'ती माझीच झाली पाहिजे' अशा प्रकारची भाषा करू लागला, तर त्याकडे दुर्लक्ष करणे धोकादायक ठरू शकते. पालकांनी मुलांशी संवाद साधताना केवळ चौकशी किंवा नियंत्रणाचा दृष्टिकोन न ठेवता विश्वासाचे वातावरण निर्माण केले पाहिजे. मुलांना आपले दुःख,




अपयश, प्रेमभंग, असुरक्षितता किंवा राग मोकळेपणाने सांगता आला पाहिजे. संवादाची दारे बंद असतील, तर समस्या अनेकदा आतच वाढत जाते.

महाविद्यालय म्हणजे केवळ वर्ग, परीक्षा आणि उपस्थिती नव्हे. विद्यार्थ्यांना भावनिक बुद्धिमत्ता, राग व्यवस्थापन, निरोगी नातेसंबंध आणि नकार स्वीकारण्याची क्षमता यांचेही शिक्षण मिळायला हवे. एखादा विद्यार्थी वारंवार धमकी देत असेल, पाठलाग करत असेल किंवा एखाद्या विद्यार्थिनीला त्रास देत असेल, तर तरुणपण आहे, होईल ठीक असे म्हणणे म्हणजे संभाव्य धोक्याकडे दुर्लक्ष करणे होय. महाविद्यालयांमध्ये समुपदेशन व्यवस्था, तक्रार निवारण यंत्रणा आणि विद्यार्थ्यांना सुरक्षितपणे मदत मिळवून देणाऱ्या व्यवस्था प्रभावी असणे आवश्यक आहे. छेडछाड, ऑनलाइन त्रास, धमकी किंवा पाठलाग यांना सुरुवातीच्या टप्प्यावरच गांभीर्याने घेतले तर अनेक प्रसंग बिघडण्यापूर्वी थांबवता येऊ शकतात.

आपण मुलींना सांगतोरात्री बाहेर जाऊ नका, सावध राहा, कुणावर विश्वास ठेवू नका. सावधगिरी आवश्यक आहे; पण त्याचबरोबर मुलांनाही हे शिकवावे लागेल की आपल्या उपस्थितीत एखादी स्त्रीती ओळखीची असो वा अनोळखीतिला सुरक्षित आणि सन्मानितच वाटले पाहिजे. तिच्या स्वातंत्र्याचा आदर करणे आणि तिच्या 'नाही'चा स्वीकार करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. एखादी मुलगी रात्री बाहेर आहे, एखाद्या मुलासोबत आहे, तिने कपडे कसे घातले आहेत किंवा तिच्या निर्णयाशी आपण सहमत नाहीयापैकी कोणतीही गोष्ट तिच्यावर अत्याचार करण्याचा अधिकार कोणालाही देत नाही. तिचे स्वातंत्र्य, तिची इच्छा आणि तिचा नकार यांचा आदर करणे हीच सभ्य समाजाची ओळख आहे.

आपण छेडछाडीला अनेकदा किरकोळ प्रकार समजतो. पाठलाग, वारंवार फोन, ऑनलाइन त्रास, धमक्याहे 'प्रेमाचे प्रयत्न' नसून संभाव्य धोक्याचे संकेत असू शकतात. अशा वर्तनाला सुरुवातीलाच कुटुंब, महाविद्यालय आणि कायदा यंत्रणेने गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. हिंसक घटना अनेकदा अचानक घडल्यासारख्या दिसतात; परंतु त्यापूर्वी धमक्या, पाठलाग, नियंत्रणाची भावना किंवा त्रास देण्याचे संकेत दिसत असू शकतात. त्यामुळे अशा संकेतांकडे दुर्लक्ष न करता योग्य वेळी हस्तक्षेप करणे महत्त्वाचे आहे.

प्रत्येक हिंसक तरुणामागे समाजाचीच चूक असते असे नाही. व्यक्तिमत्त्व, मानसिक अवस्था, मित्रपरिवार, पूर्वानुभव, पदार्थांचे



सेवन, हिंसक प्रवृत्ती आणि अनेक वैयक्तिक व परिस्थितिजन्य घटक त्यामागे असू शकतात. त्यामुळे कोणत्याही एका कारणाला अशा घटनांसाठी जबाबदार धरणे योग्य ठरणार नाही. मात्र प्रतिबंधाची जबाबदारी समाजाची नक्कीच आहे. कुटुंब, शाळा, महाविद्यालय, मित्रपरिवार, माध्यमे आणि कायदा यंत्रणाया सर्वांनी मिळून तरुणांना नात्यांकडे अधिक संवेदनशील, जबाबदार आणि समताधिष्ठित दृष्टिकोनातून पाहायला शिकवणे आवश्यक आहे. मुलांना केवळ करिअरच्या स्पर्धेसाठी तयार करण्यापेक्षा त्यांना माणूस म्हणून घडवणे अधिक महत्त्वाचे आहे.

आजच्या पिढीला काही मूलभूत गोष्टी ठामपणे शिकवण्याची गरज आहे

नकार म्हणजे अपमान नाही. प्रेम म्हणजे मालकी नाही. पुरुषत्व म्हणजे आक्रमकता नाही. राग म्हणजे हिंसा नाही. आणि प्रेम सिद्ध करण्यासाठी कुणाचा जीव घेणे म्हणजे प्रेम नव्हेती हिंसा आहे.

समाज बदलण्याची सुरुवात कायद्यापासून होऊ शकते; पण ती पूर्णत्वाला जाते ती घरातील संस्कार, शाळेतील शिक्षण आणि माणूस म्हणून घडविणाऱ्या मूल्यांमधून आणि ज्या समाजात आपण वावरतो त्या समाजातूच.

****

मी दिवा विझवला नाही : माणुसकीचा निस्सीम ध्यास गझल

ज्योतिर्मय साहित्य

शब्दस्नेही गिरीश जोशी (गझलगिरीश)या मित्राने तन्मयतेने मला त्याचा गझलसंग्रह दिला झपाटल्यागत वाचला यातला प्रत्येक शेर, मतला पहिली ओळ आमद तिची लय, यती, आशय प्रपंच आवडून गेला इतकं नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेय भावनेतून ही काव्यभक्ती गझलगिरीश यांची होऊन आली आहे. गझलेची तंत्रसाधना अवगत होणे इतके चं नाही तर इथं अंतरंगी सृजनशीलता व मनाचे भावतरंग अलगद काट्याच्या आनीवर फ ुलपाखरू होऊन बसावं इतकी नजाकत गझलेत आहे.

''चेहरा माझा तमाने झाकला नाही कधी
मी प्रकाशाच्या पिढीचा वारसा सांभाळतो.''

खरंच ही गझल साधना म्हणजे भावमनाचं सच्चेपणं आहे.

कारण विद्यार्थी ज्ञानार्जीत करणे. हा वसा आणि वारसा

अंतरंगी आहे. ही ज्ञान साधनेची सार्थक्ता आहे. विद्यार्थी दैवत अन् त्यांच्या प्रतिची मनस्वी असक्ती. वर्ग हाच स्वर्ग मानणारा अध्यापक प्रकाशाच्या पिढीचा वारसा सांभाळणारे गिरीश जोशी जी. गझल ही जरी प्रेमाचे सजल रूप धारण करते पण तिचा अटकर बांधा ही देखणा असावा लागतो.तशी ही गझल सर्वव्यापी आहे.मग ती सुंगधी कहर, मोगऱ्याची कदर, साजणीची खबर, म्हणून सविनय गझलेची धारणा अशी,

''ना सूर्य कुणाचा झालो,ना पणती होऊ शकलो
पण कुठल्याही घरट्याचा, मी दिवा विझवला नाही''


ही अनंत नितळ निर्लेप निस्पृह श्रद्धेची निस्सीम प्रेम भक्तीची परिपूर्णता आहे. हे मनाचं अथांगपण सांगून जातं.

या गझलेची व्यापक्ता ही सविनय भावानेचा व आत्ममग्नतेचा परिपोष आहे. खरतर या गझलेचा अंतर माणुसकी हाच ध्यास आहे.मानवी वृत्ती प्रियवृती स्नेहाळू भाव मनाला व्याकुळ करुन जातो. इतकं अतोनात नातं या गझलेचं माणुसकीशी आहे.माणुसकी म्हणजे आत्मिक अंतःकरणीय मायाळूपास हाच ध्यास. जसे

''राखेमधली धग बाकी, थांबलास का जग बाकी.
खुशाल होवो जग वैरी, ठेव एक जिवलग बाकी.''

ही जगण्याची सकारात्मक विचारधारेची पेरणी आणि पराकोटीचा आशावाद या गझलेने दिला आहे.

गझलगिरीश यांना चांगल्या सुसंगतीची ओढ



आहे.

''नेहमी गाईन मी नांदी तुझी
मन तुझे सोने नजर चांदी तुझी.
ह्याच वाक्याने तुझ्या निर्धास्तलो
जन्मभर होईन फांदी तुझी''

हे निस्सीम स्नेहाळू माणूसकीच्या भक्तीचं प्रतिक.

ओंजळभर गझलेंची फुले अर्पण करत आपल्या सन्मित्र भावनेचा ओलावा कायमचं टिकला पाहिजे. कारण मनाची मशागत ही गझल करते. इतकं हळवा गहिवर यातून येतो.

गझल हा काव्यप्रकार अत्यंत तेजस्वी साधनेचा मतला, शेर ही तिची खरी संपत्ती आहे.मनाच्या तरलं भावबंध तर आहेच मन तितकीच दर्द कैफियत आहे.जसे

''वेदनेच्या लक्तरांची सोडते झोळी गझल
खिन्न झालेल्या मनाला सुचविते ओळी गझल''

हे मनस्वी संयत मनोभूमिकेतून अस्सल गझलेची ठेवणं आहे. ख्यातनाम जेष्ठ गझलकार प्रमोद खराडे प्रस्तावनेत

''जरी आटलो असेन आता,
कधी कुणाचा सागर होतो.''

दोन ओळींमध्ये एका शेरात कमाल आशय व्यक्त करता येणं, अर्थात गागरमे सागर भरना हेच चांगल्या शेराचं आणि त्यामुळेच गझल लोकप्रिय असण्याचेही कारण आहे. अर्थात त्यासाठी तो गझलकार वकुब असणारा हवा.

गिरीश जोशी यांनी चांगली सिद्धी मिळवली आहे.हे ध्यानात येतं ''(प्रस्तावना)गझलेत आशयाचा प्राण फुंकणं खऱ्या गझलकारचा आत्मा आहे तो साधनेतून व हळूवार सृजनशीलतेतून कायमचं ठेवावा लागतो ती उतरत जाते गझल काळजात तिचा मतला होतो आविष्कार तर शेर मनाचा तळडोह ढवळून काढतो.

''जगाला जरी मी जुना होत गेलो
तिला भेटल्याने नवा होता आहे.
तिला सूर्य होऊन शोधू न शकलो
तिला शोधण्या काजवा होत आहे''(पृ.२०)

ही या गझलेची नजाकत आहे.या अस्वस्थ जगण्याच्या कोलाहल व मनाचे दिव्यत्व असे की या स्मशानासही स्वर्ग बनवता येते. पण शेजारी प्रेयसीची कबर पाहिजे. आज या भंयकराच्या दारात वेदना घेऊन जगणारे माणसं पाहून मन व्यथीत होते तेव्हा हे भलतेच रोग आम्ही लावून घेतले. तर या आजच्या वर्तमानाची वास्तव भंयकर आहे.कागदोपत्री स्त्री -सबलीकरण झाले आहे.

''कागदोपत्रीच स्त्री- सबलीकरण होते
मुख्य चौकातून मुलगी घाबरत जाते..
भरवशाचा पोस्टमन असते नजर अपुली
या मनाचे त्या मनाला पोचवत जाते''(पृ.३३)

हे अतिशय विदारक सत्य या गझलेने मांडले आहे.कारण माणुसकी हाच कवीचा ध्यास आहे. मातृत्व, पितृत्व, सखा, सखी, नाते या मंतरलेल्या मायाळू स्नेहाळू भावनेचा ओलावा ही गझल देऊन जाते इतकं नितळ श्रेध्दय निर्लेप निस्पृह प्रेम या गझलेत आहे. इथल्या माणसाच्या वृत्ती-विकृतीवरचे भाष्य अतिशय मनापासून आहे.तू तुझ्यातला रावण मार या षड्रिपुचा रावण मार,म्हणून

''षड् रिपूंच्या रावणाला रोज आता जाळ तू
रावणाला जाळण्या दसरा कशाला पाहिजे?''(पृ.४३)

या मानवी मनाच्या झगमगाटाला शब्द अंजन घालणारी ही गझल असल्याने''बंद ओठांचे कुलूप उघडायला/

फक्त ओठांचीच चावी लागते/ऐरणीचा प्रश्न मार्गी लागतो/

एकदा बस वेळ यावी लागते'' (पृ.४५) या माध्यमातून सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक भरणं पोषण या गझलेच्या दृष्टीने समर्पक समृद्ध सकारात्मक विचारधारेची पेरणी करणारी ही गझल आहे.सांजवेळी स्मृतीची पाखरं मनाच्या फांदीवर बसतात.सूर्य अस्ताला गेला की हा भोवताल कृष्ण होतो.मनाची ओलं मोजणे, या मनस्वी चिंतन मंथन मर्मबंध सांगणारी गझल खरंच किती हळवी असते.

''माय शिवतांना किती गोंजारते!
शर्ट म्हणतो चारदा उसव मला...
मी मराया लागता इतके करा
चार गझला ऐकवा जगवा मला..
सत्य होऊन उगवणारा सूर्य मी
स्पर्शही नाही करत अफवा मला ''(पृ.५२) ही प्रचंड मनाची तरलं अद्यम्य इच्छा ही कविता मनमस्तिष्कांच्या खोल डोहातलं अत्तर आहे.तर लेखक वक्ते सन्मित्र शरद तांदळे अतिशय मौलिक संदेश देतात ''गिरिशजीच्या गझलेत प्रेम, माणुसकी,


गझलकार : गिरीश जोशी


परीक्षण : डॉ प्रभाकर शेळके

आपलेपणा, स्वाभिमान, नात्यांमधील विश्वास इत्यादी भावबंधाचा मिलाफ पहायला मिळतो.त्यांच्या रचनामधील सौंदर्यदृष्टी, प्रतिमासृष्टी, खयालाचे वेगळेपण, विशिष्ट शैली आणि गझलेतील नाविन्य मला फार भावले त्यामुळेच गिरीश जोशी यांचा संग्रह निघाला'' (शुभेच्छा संदेश) हे अतिशय चिंतन आशय संपन्न भाष्य आहे. पण कुठल्याही घरट्याचा मी दिवा विझवला नाही. हे मनस्वी मनाचं हळवेपण आणि हा गझलेचा माणुसकीचा मळवट ललाटी घेऊन आलेला सिद्धहस्त गझलकार. गझल धन्वंतरी होणे, गझल कांदबरी होणे, चांगूलपणाची ओढ ही सत्संगतीची आहे. या गझलेत विचार आचार व संस्कृती संस्काराची शिदोरी घेऊन आलेली ही गझल आहे. मनात अति नितळपण जेव्हा गझलेतून निर्झर होतं तेंव्हा द्वेषाची दुनिया बदलते एवढा अद्यम्य विश्वास या गझलेने दिला आहे.जसे

''सोसलेल्या वंचनाचे सारं गझला
सोबती आहेत माझ्या चार गझला.
कोणत्या मापात मोजावे कळेना

भावनेच्या सागरी विस्तार गझला. ''गझलनवाज भीमराव पांचाळे व्वा! क्या कहने है गिरीश!!. ही मनस्वी स्नेहांकित हृदयाची शाबासकीची थाप या गझलेने मिळवली आहे.या मंतरलेल्या गझला ख्यातनाम गायक/गायकांनी गायल्या आहेत. हे श्रेयस या गझलेचं आहे. एक माणसा विषयचा माणूसकीचा गहिवर पहा.

''जनतेपेक्षा नेता कोणी मोठा नसतो
राजा अपुला सेवक असतो राजा नसतो.
या सृष्टीवर प्रेमच केवळ शाश्वत असते
प्रेमाइतका अतूट कुठला धागा नसतो''(पृ.७४)

चिंतनाचे खत दिल्यावर दानेदार गझला झाल्या, पाण्यावर तरते तेंव्हा तुकोबांची गाथा कळते,या संस्कारांची खरी ओंजळ आजी असते.तमाने चेहरा झाकला नाही प्रकाशाच्या पिढीचा वारसा सांभाळने ही सविनय भावना अतिशय मौलिक विचार अधिष्ठान प्राप्त करणारी आहे.पुस्तके वाचून खरे खोटे चेहरे माणसाचे वाचता येते.

''जो आपुला म्हणावा पाठीत वार करतो
प्याला हलाहलाचा भरवून जात आहे
पैसाच राक्षसी अन् वैरी कसा निघाला
पाश्चात्य संस्कृतीला रुजवून जात आहे''(पृ.११९)

ही गझल समकालीन वास्तवाचे सम्यक भान देऊन जाते. गझलेचे अंतरंग हे स्वर साधनेचा ही आत्मा आहे.शेर मतला व आमद व यतीच्या रोह-अवरोह शलाका मांडणे ही मनस्वी मैफल होते. एवढे अनभिषिक्त गझल गिरीश जोशी यांची आहे. या गझलसंग्रहांचे मुखपृष्ठ कवी कलावंत

आपल्या सृजनशील भूमिकेचा नायक असतो. तो या मानवाच्या अस्वस्थ वेदनीची गझल होऊन जगतो आहे.

अतिशय आशय संपन्न सृजन समर्पक विचार चिंतनाचे कवी गझलगिरीश यांना अनंत शुभेच्छा.

पुस्तक:-मी दिवा विझवला नाही (गझलसंग्रह)
गझलकार : गिरीश जोशी (गझलगिरीश)
प्रकाशक : संतोष तांदळे न्यू ईरा पब्लिकेशन हाऊस,पुणे प्रथमवृती:-३१ मे २०२६
मुखपृष्ठ:-संतोष धोंगडे
पृष्ठ संख्या:-१२०/किंमत:-२५०रूपये
पुस्तक परिचय:- डॉ प्रभाकर शेळके, जालना

वाचवू पाणी, वाचवू जीवन थेंब थेंब जपू प्रत्येक क्षण

ज्योतिर्मय साहित्य

मित्रांनो,

पाणी म्हणजे जीवन.

पाणी म्हणजे निसर्गाने मानवाला दिलेली अमूल्य देणगी.

पाणी म्हणजे पृथ्वीवरील समस्त सजीवांच्या अस्तित्वाचा आधार

पण आज याच जीवनदायी पाण्याच्या भवितव्याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आता आली आहे.

यंदा पावसाने अनेक भागांत अपेक्षाभंग केला आहे. पावसाची आतुरतेने वाट पाहून बळीराजा थकून गेला आहे, हतबल झाला आहे. पावसाअभावी पिके करपली, शेतीचे नुकसान झाले आणि शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले. आधीच अनेक अडचणींना सामोरे जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या चिंतेत आणखी भर पडली आहे.

त्यातच ऑक्टोबर महिन्यात जाणवणारी वाढती उष्णता आणि अल निनोच्या संभाव्य प्रभावाविषयी व्यक्त होणारे अंदाज पाहता, आगामी काळात पाणीटंचाईचे संकट अधिक गंभीर होण्याची भीती आहे. पुढील सहा ते आठ महिने पाण्याच्या दृष्टीने आव्हानात्मक ठरू शकतात, अशी चिंता अनेकांकडून व्यक्त होत आहे.

अर्थात, भविष्यातील परिस्थिती नेमकी कशी असेल? हे आज निश्चितपणे सांगता येणार नाही. परंतु संकट येण्याची वाट पाहण्यापेक्षा त्याचा सामना करण्यासाठी आजपासूनच तयारी करणे अधिक शहाणपणाचे नाही का?

आज पाणी वाचवण्याचा विचार करून त्याची अंमलबजावणी केली नाही, तर उद्या डोळ्यांत पाणी आणण्याची वेळ आल्याशिवाय राहणार नाही,म्हणूनच आता वेळ आली आहे, पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरण्याची, पाण्याचा अपव्यय थांबवण्याची आणि जलसंधारणाला आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याची.

माणूस अन्नाशिवाय काही दिवस जगू शकतो, परंतु पाण्याशिवाय जीवनाची कल्पनाही करता येत नाही. म्हणूनच पाण्याला जीवन असे म्हटले जाते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत पाणी आपल्या प्रत्येक कृतीत सहभागी असते. ब्रश करण्यापासून, स्नान करण्यापर्यंत, स्वयंपाकापासून भांडी घासण्यापर्यंत, कपडे भिजवण्यापासून ते धुण्यापर्यंत आणि शेतीपासून उद्योगधंद्यांपर्यंत पाण्याशिवाय आपले पानही हलत नाही.

माणूस, पशुपक्षी, झाडे, वेली आणि या सृष्टीवरील प्रत्येक जीव पाण्यावर अवलंबून आहे. नद्या, तलाव,



विहिरी आणि धरणे ही आपली खरी संपत्ती आहे. मात्र, या संपत्तीचे मोल आपण खरोखर ओळखले आहे का?

हा प्रश्न प्रत्येकाने स्वतःला विचारण्याची गरज आहे.

आज अनेक ठिकाणी नळाला मुबलक पाणी येते म्हणून आपण ते निष्काळजीपणे वापरतो. ब्रश करताना नळ सुरू ठेवतो, गाडी धुताना गरजेपेक्षा अधिक पाणी वापरतो, गळणारे नळ वेळेवर दुरुस्त करत नाही आणि घरातील छोट्या छोट्या कामांतून किती पाणी वाया जाते, याकडे दुर्लक्ष करतो.

या चुका वरकरणी लहान वाटतात, पण त्यातून होणारा एकत्रित अपव्यय मोठा असतो.

एका व्यक्तीने वाया घालवलेला पाण्याचा थेंब कदाचित नगण्य वाटेल, पण लाखो लोकांनी केलेल्या निष्काळजीपणातून कितीतरी लिटर पाणी वाया जाते.

एकीकडे शहरांमध्ये पाणीपुरवठ्याच्या समस्या आहेत, तर दुसरीकडे ग्रामीण भागातील अनेक गावांमध्ये उन्हाळा सुरू होताच विहिरी आटतात, तलाव कोरडे पडतात आणि पाण्यासाठी महिलांना मैलोन मैल पायपीट करावी लागते.

शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर पिके करपतात. जनावरांना पाणी मिळवण्यासाठी भटकावे लागते. पिण्याच्या पाण्यासाठी होणारी धावपळ संपूर्ण कुटुंबाला त्रस्त करते.

हे सारे चित्र पाहिल्यानंतर मनात एकच विचार येतो,पाणी असताना त्याची किंमत कळत नाही, पण ते संपण्याची वेळ आली की त्याचा प्रत्येक थेंब अनमोल वाटू लागतो.

निसर्ग आपल्याला पावसाच्या रूपाने पाणी देतो. मात्र, पावसाचे पाणी जमिनीत मुरवण्यासाठी आणि भविष्यासाठी साठवण्यासाठी आपण किती प्रयत्न करतो? हा मुद्दा तर

वेगळाच,त्यात वाढते काँक्रीटीकरण, वृक्षतोड, नैसर्गिक जलस्रोतांवरील अतिक्रमणे आणि पाण्याचे प्रदूषण यांमुळे पाण्याची समस्या अधिक गंभीर होत आहे.

पाऊस पडतो, पाणी वाहून जाते आणि काही काळानंतर पुन्हा पाणीटंचाईचा सामना करावा लागतो. पावसाचे पाणी जमिनीत मुरले, तर भूजलपातळी सुधारण्यास मदत होते. पाणी साठवण्याच्या योग्य व्यवस्था केल्या, तर त्याचा उपयोग पुढील काळात करता येतो.

म्हणूनच पावसाच्या प्रत्येक थेंबाचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक असते.

नैसर्गिक पाऊस पडणे प्रत्यक्ष आपल्या हातात नाही, पण पडलेल्या पावसाचे पाणी जपणे नक्कीच आपल्या हातात आहे.

आणि घरातील असलेले पाणी वाचवण्यासाठी प्रत्येकाने आपल्या घरापासून सुरुवात केली पाहिजे. त्यासाठी काही साधे, पण परिणामकारक उपाय आपण सहज करू शकतो.

१. नळाचा वापर जपून करू या.

ब्रश करताना, दाढी करताना किंवा साबण लावताना नळ बंद ठेवूया. गरज असेल तेव्हाच पाणी सुरू करूया.

२. पाण्याची गळती थांबवू या.

गळणारे नळ, पाइप आणि पाण्याच्या टाक्यांतील गळती त्वरित दुरुस्त करूया. थेंबाथेंबाने होणारा अपव्ययही थांबवूया.

३. पावसाचे पाणी साठवूया.

घराच्या छतावरील पावसाचे पाणी साठवण्याची किंवा योग्य पद्धतीने जमिनीत मुरवण्याची व्यवस्था करूया. शक्य असेल तेथे रेनवॉटर हार्वेस्टिंगचा अवलंब करूया.

४. शेतीत पाणी बचतीला प्राधान्य देऊया.

शक्य असेल तेथे ठिबक सिंचन आणि तुषार सिंचनासारख्या पाणी बचत करणाऱ्या पद्धतींचा वापर करूया.

५. झाडांना गरजेपुरतेच पाणी देऊया.

योग्य वेळ आणि योग्य प्रमाण यांचा विचार करून पाणी वापरूया. शक्य असेल तेथे सकाळी लवकर किंवा संध्याकाळी पाणी देऊया.

६. वापरलेल्या स्वच्छ पाण्याचा पुनर्वापर करूया.

भाजीपाला धुतलेले किंवा इतर घरगुती कामांतून उरलेले तुलनेने स्वच्छ पाणी योग्य असेल तेथे झाडांसाठी वापरूया.

७. जलस्रोत स्वच्छ ठेवूया.

नद्या, तलाव आणि विहिरींमध्ये कचरा, प्लास्टिक किंवा रासायनिक पदार्थ टाकू नयेत. पाण्याचे प्रदूषण रोखणे हीदेखील पाणी वाचवण्याची महत्त्वाची पायरी आहे.

८. वृक्षारोपण आणि जलसंधारण करूया.


झाडे लावूया, त्यांचे संगोपन करूया, पाणलोट क्षेत्रांचे संरक्षण करूया आणि गावोगावी जलसंधारणाच्या कामांना प्रोत्साहन देऊया.

९. मुलांमध्ये पाणी बचतीचे संस्कार रुजवूया.

लहानपणापासूनच मुलांना पाण्याचे महत्त्व समजावून सांगूया. पाणी जपणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे, याची जाणीव करून देऊया.

१०. पिण्याचे पाणी जपून वापरू या.

घरातील प्रत्येक सदस्याने पाणी पिताना जेवढे लागेल तेवढेच ग्लासमध्ये घ्यावे. पाहुण्यांनाही सुरुवातीला अर्धा ग्लास पाणी द्यावे. आणखी हवे असल्यास पुन्हा द्यावे. यामुळे ग्लासमधील उरलेले पाणी फेकून देण्याची वेळ येणार नाही.



११. स्नान करतानाही पाण्याची बचत करूया.

पाणीटंचाईची शक्यता असताना शॉवर ऐवजी बादलीचा वापर करू या. एका बादलीतील पाण्याने स्नान करता येईल का, याचा विचार करू या.

पाणी वापरताना काटकसर म्हणजे गैरसोय नव्हे, तर परिस्थितीचे भान ठेवून केलेली जबाबदारीची कृती आहे.

१२. समाजात पाणी बचतीचा संदेश पोहोचवूया.

आपल्या सोसायटीत, परिसरात, गावात आणि कार्यस्थळी पाणी बचतीबाबत जनजागृती करू या. पाण्याचा अपव्यय दिसल्यास नम्रपणे त्याकडे लक्ष वेधू या आणि स्वतःही कृतीतून आदर्श घालून देऊ या.

मित्रांनो, पाणी वाचवण्यासाठी नेहमी मोठे प्रकल्प उभारण्याची गरज नसते. आपल्या सवयी बदलल्या, आपल्या घरातील पाण्याचा वापर नियंत्रित केला आणि प्रत्येक सदस्याने आपली जबाबदारी ओळखली, तरी मोठा फरक पडू शकतो.

एका कुटुंबाने पाणी वाचवले, तर त्या कुटुंबातील पाण्याची बचत होते. अनेक कुटुंबांनी पाणी वाचवले, तर समाजा साठी बचत होते. संपूर्ण समाजाने पाण्याचे महत्त्व ओळखले, तर देशाचे भविष्य अधिक सुरक्षित होऊ शकते.

आज आपण पाणी जपले, तर उद्याच्या पिढीला पाण्यासाठी संघर्ष करावा लागणार नाही. आपल्या मुलांना हिरवीगार शेती, खळाळत्या नद्या, भरलेली तळी आणि समृद्ध निसर्ग अनुभवता येईल.

अन्यथा, पाण्याचा प्रत्येक थेंब विकत घेण्याची वेळ येऊ शकते. आणि पैसा मोजूनही पुरेसे पाणी मिळेलच, याची खात्री देता येणार नाही.

म्हणूनच पाणी बचत ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नाही, तर सामाजिक कर्तव्य आहे. ती भावी पिढ्यांप्रती असलेली आपली नैतिक जबाबदारी आहे.

शेवटी एवढेच,पाण्याचा प्रत्येक थेंब हा निसर्गाचा अनमोल ठेवा आहे. त्याचा अपव्यय करणे म्हणजे आपल्या भविष्याची हानी करणे होय. पाणी ही केवळ आजच्या पिढीची संपत्ती नाही, ती पुढील पिढ्यांसाठीही जपून ठेवण्याची आपली जबाबदारी आहे.

आज पाण्याचे संकट आपल्याला सावध करत आहे. निसर्ग आपल्याला जणू सांगत आहे,

वेळीच जागे व्हा, पाण्याचे मोल ओळखा आणि प्रत्येक थेंब जपा.

चला तर मग, आजपासूनच संकल्प करू या. पाणी वाया घालवणार नाही, इतरांनाही पाण्याचा अपव्यय करू देणार नाही आणि जलसंधारणासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करूया.

कारण पाणी असेल तरच उद्या असेल, पाणी असेल तरच शेती फुलेल, पाणी असेल तरच निसर्ग हसेल आणि पाणी असेल तरच जीवन बहरून येईल.

जल आहे तर उद्याचा काळ आहे, अन्यथा पाण्यासाठी हाल अपेष्टा ठरलेल्याच आहेत.

चला, केवळ विचार नको,
आता कृती करू या
चला, शपथ घेऊ या,
आम्ही वाचवू पाणी,
आम्ही वाचवू जीवन,
थेंब थेंब साठवू आम्ही,
पाणी जपू प्रत्येक क्षण

***

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559